शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुट्स
काजु | किसमिस | खोबरं | केर सांगरी | मेलन सीडस्
बदाम | काळा मनुका | गाईचे तुप | कागदी बदाम | खारीक खोबरं मिक्स
अंजीर | जरदाळू | धावडा डिंक | सनफ्लॉवर सीडस् | खारा काजू
अक्रोड | मखाना | मामरा बदाम | चिया सीडस् | मसाला काजू
खारा पिस्ता | खारीक | खजुर | पमकीन सीडस् | खारा बदाम
ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पॉमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट
भूमी एजन्सीज सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २६.११.२०२४ | अंक नं. २२४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

## अतिक्रमणे आणि बेशिस्त वाहतुकीमुळे शहरातील रस्ते बनलेत ‘मृत्यूचे सापळे’

### वाहतूक शाखेचे अस्तित्व केवळ कागदावरच, महापालिका प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज

नगर - वारंवार होत असलेल्या अपघाती घटना आणि त्यात होत असलेली जीवीतहानी लक्षात घेता शहरातील वाढते अतिक्रमणे आणि बेशिस्त वाहतुकीबाबत प्रशासकीय पातळीवरून ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. अतिक्रमणाने अनेक रस्ते वेढले गेले असून, बेशिस्त वाहतुकीमुळे अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. असे असताना शहर वाहतूक शाखा ही केवळ कागदावरच अस्तित्वात आहे की काय? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

शहरातील बाजारपेठा, रस्ते, चौक अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले आहेत. अनेक रस्त्यांच्या बाजूने टपऱ्या, हातगाड्यांसह पक्की बांधकामाची अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. वर्दळीचे चौक आणि चौपाट्या अतिक्रमणांनी वेढले गेले आहेत. या अतिक्रमणांमुळे रस्त्याने वाहने चालविणेही कठीण झाले आहे. अतिक्रमणाचा मुद्दा यापूर्वी अनेकदा ऐरणीवर आलेला आहे. नागरिकांनी आवाज उठविल्यानंतर महापालिकेकडून अतिक्रमण हटावची जुजबी कारवाई केली जाते. ही कारवाई म्हणजे केवळ एक फार्स ठरत असून, अतिक्रमणधारक पुन्हा आपली अतिक्रमणे जैसे थे ठेवत आहेत. गतवर्षी बाजारपेठेतील घासगल्लीतील अतिक्रमणाचा विषय मोठ्या प्रमाणात गाजला होता. अतिक्रमणास विरोध करणाऱ्या व्यापाऱ्यावर हल्ला करण्याची घटना घडली होती. या घटनेनंतर पोलिस आणि महापालिकेने कारवाई करण्यास सुरुवात केली. मात्र वातावरण निवळल्यानंतर पुन्हा जैसे थे परिस्थिती झाली.

आज शहरातील सर्वच रस्ते आणि चौक अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असून, वाहतूक कोंडीचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक शाखेच्या दुर्लक्षामुळे बेशिस्त वाहतूक बोकाळली आहे. बेशिस्त वाहन चालविल्यामुळे अपघाताच्या घटना घडत आहेत. मार्केट यार्ड, महात्मा फुले चौकातील घटनाही बेशिस्त वाहतुकीचाच परिणाम आहे. शहर वाहतूक शाखेचे कर्मचारी क्वचितच एखाद्या चौकात दिसतात. बहुतांश वाहतूक पोलिस शहरात थांबण्याऐवजी बायपास आणि महामार्गावरच उभे असलेले पहायला मिळत आहेत. त्यामुळे शहरात बेलगाम झालेल्या वाहतुकीमुळे अनेकांना आपले जीव गमवावे लागत आहेत.

शहरातील अतिक्रमणे आणि वाहतूक नियंत्रणासाठी ठोस कृती आराखडा राबविणे गरजेचे आहे. महापालिका आयुक्त आणि शहर वाहतूक शाखेच्या वरिष्ठांनी याबाबत ठोस उपाययोजना राबवून कारवाईचे धाडस दाखविल्यास अतिक्रमण मुक्त शहर होऊ शकेल. अतिक्रमणे हटविल्यास रस्त्यांचाही श्वास मोकळा होऊन वाहतूक कोंडी आणि अपघाताच्या घटना टळल्या जातील. त्याचबरोबर त्यात होणारी जीवीत हानी टळेल परंतु त्यासाठी अधिकाऱ्यांनी धाडस दाखवून ठोस कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
दि. २५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडून)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
* मोफत अॅन्जीओप्लास्टी
* मोफत डायलेसीस/किडनी विकार
* मोफत कर्करोग शस्त्रक्रिया
* मोफत नवजात अतिदक्षता विभाग
* मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध | मोफत साखर तपासणी | २४ तास अत्यावश्यक व अॅम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध | अॅडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंध्यत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
* शिबीरस्थळ *
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001
टिप : नांव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.

## ।। ७ वे पुण्यस्मरण ।।

लोकसेवेचे व्रत आपण जीवनभर जपले...
स्वतः चंदनापरी झिजुन इतरांना सुगंध देत राहीले...
सुसंस्कार ... समय सूचकता... सर्वांवर असलेली प्रेमभावना
यामुळेच आपण वंदणीय झाले...



**कै.डॉ. रावसाहेब अनभुले**
१ एप्रिल १९४० - २७ नोव्हेंबर २०१७

।। विनम्र आदरांजली ।।

डॉ. क्रांतीकला रावसाहेब अनभुले
डॉ. भूषण रावसाहेब अनभुले
डॉ. दिपाली भूषण अनभुले

- डॉ. अनभुले हॉस्पिटल मल्टीस्पेशालिटी
- डॉ. अनभुले मेडिकल रुरल डेव्हलमेंट अॅण्ड सोशल फौंडेशन
- क्रांती नर्सिंग कॉलेज
- अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल तसेच सर्व कर्मचारी वृंद.

होम सर्व्हिस (मसाज)
प्रोफेशनल केरला व आयुर्वेदिक पध्दतीने घरी येऊन फूलबॉडी मसाज करुन मिळेल.
मसाजची ट्रेनिंग सुध्दा उपलब्ध.
पेशंट केअरसाठी नर्सिंग स्टाफ मिळेल.
Full Body Massage
मंथली बेसेसवर सुध्दा उपलब्ध
9850127508 / Mo.8830275190

सेल्समन पाहिजेत
त्वरीत संपर्क साधा। आकर्षक पगार।

| | |
|---|---|
| Accountant (M/F) | - 02 |
| Driver (Exp.) | - 01 |
| Salesman (Marketing) | - 02 |
| Counter Salesman (Exp.) | - 05 |
| Helper | - 04 |

गांधी क्रिएशन होलसेलर - रेडिमेड गारमेंट्स | सिझनल वेअर्स | होजियरी
कलेक्टर ऑफिस रोड, गुंदेचा एजन्सी जवळ, बुरुडगल्ली, अहिल्यानगर. संपर्क : 9960352424 / 9860380365



सर्व भाविक भक्तांना
आळंदी यात्रेनिमित्त
मन:पूर्वक शुभेच्छा !





**मा. श्री. अविनाश देडगांवकर**
धार्मिक गौरव पुरस्कार विजेते
समाजसेवक, अहिल्यानगर

## भावपूर्ण श्रध्दांजली

विहाय कामान्य: सर्वान्पुमांश्चरति नि:स्पृह:।
निर्ममो निरहंकार: स शान्तिमधिगच्छति ।।
जो पुरुष सम्पूर्ण कामनाओं को त्याग कर
ममता रहित, अहंकार रहित और स्पृहारहित विचरता है,
यही शान्ति को प्राप्त होता है अर्थात् वह शान्ति को प्राप्त है।। ७१।।



अत्यंत: दु:ख के साथ सुचित किया जाता है कि,
हमारे परिवार के ज्येष्ठ सदस्य
**स्व. श्री. मनसुखलालजी मुनोत**
इनका दिनांक २१/११/२०२४ को दु:खद निधन हुआ है।
नियती के आगे हम सभी नतमस्तक हैं।

**प्रार्थना सभा**
बुधवार, दि. २७ नवंबर २०२४, दोपहर ४ से ६ बजे तक
स्थान - केशर गुलाब मंगल कार्यालय
धार्मिक परिक्षा बोर्ड के समीप, अहिल्यानगर.

शोकाकुल परिवार
केशरगुलाब मुनोत (नेवासकर) परिवार

VAISHNAVI TILES & TRADING CO.
* सर्व प्रकारच्या टाइल्स * ग्रॅनाइट * सॅनिटरी वेअर
* पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग * C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
VARMORA TILES • BATHWARE | KERAKOLL The GreenBuilding Company | CARYSIL German Engineered | colortile | RAK CERAMICS | India's No. 1 NIRALI BG | TIMEX BOND | ICON WORLD OF TILE
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## निसर्गाशी संवाद साधणारा सर्वश्रेष्ठ कलावंत

संत ज्ञानेश्वरांचे जन्म दैवी अवतारच म्हणा. पण मला त्यांचे मोठेपण जाणवते ते त्यांनी सांधलेल्या निसर्गसंवादात. चिद्विलासवादी ज्ञानेश्वरांना दिसणाऱ्या भावभावनांचे आविष्कार बघून आपण थक्क होतो. आपले हृदय हेलावून जाते.

संत माऊलींची कुमुदिनी म्हणजे चंद्रविकासी कमळ आपली जागा न सोडता चंद्राला दुरून आलिंगन देण्याचे सौख्य अनुभवते. त्याचे भ्रमर कमळाच्या पाकळ्यांवर अलगदज पाय ठेवतात. त्यांना न दुखावता त्यांचे पराग घेऊन जातात. त्यांच्या चकोरांची पिल्ले शारदीय पौर्णिमेच्या चांदण्याने कण हळुवार वेचतात. त्यांचा आकाशाच्या पोटात शिरलेला पारवा जमिनीवर पारविण बघताच प्रेमाने असा बेहोश होतो की, तो सगळे अंगच खाली लोटून तिच्याकडे झेप घेतो.

साधे गवताचे पाते भूमीची मृदुता सांगत लवलवत राहते. पाणी, वाटेत येणारा प्रत्येक खाचखळगा भरत, साऱ्यांच्या उणिवा दूर करत पुढे वाहत जाते.

वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



चराचर विश्वाशी असा संवाद साधणाऱ्या ज्ञानेश्वरांकडून आपल्याला कितीतरी शिकण्यासारखे आहे. ती दृष्टी, अनुभूती आपल्याला लाभली तर प्राणिमात्रांशी आपला स्नेह जुळेल. आभाळातल्या ढगांवर उडत्या पाखरांनी लिहिलेली अगम्य चित्रलिपी आपल्याला वाचता येईल. साधे झाडाचे पानदेखील आपल्याशी हितगुज करील व गवताचे पाते आपल्याकडे बघून ओळखीचे हसू असेल.

इतका समग्र, संपूर्ण विश्वात्मक संवाद जर आपल्याला साधला तर आपले एकाकीपण कुठे शिल्लक राहील. तो संवाद (सुसंवाद) साधायला मात्र हवा.

आपण सर्वसामान्य उगवता, मावळता सूर्य, हिरवीगार कुरणं, दऱ्या डोंगरे, पक्ष्यांचं गुंजन, समुद्राची गाज यांची तरी अनुभूती घेऊन निसर्ग संवाद सुरू करू शकतो...

## शांताबाई सराफ यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील भूतकरवाडीत राहणाऱ्या शांताबाई अर्जुनदास सराफ (वय ८७) यांचे २६ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नवीपेठ येथील प्रकाश गारमेंटस्चे संचालक प्रकाश सराफ यांच्या त्या मातोश्री होत.

## फुलकंवरबाई भंडारी (शिंदावाला) यांचे निधन



नगर – विनायकनगर येथील रहिवाशी फुलकंवरबाई भंडारी (शिंदावाला, वय ७६) यांचे २६ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, सून, दोन नातू, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

राजेंद्र भंडारी यांच्या त्या मातोश्री होत.

## विभाकर मोडक यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – भाग्योदय कॉलनी येथील रहिवासी विभाकर मोडक (वय ६५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. सर्वेअर व्हॅल्युअर्स व लॉस ॲसेसर म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ काम केले.

सर्वेअर्स संघटनेचे ते ज्येष्ठ सदस्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा असा परिवार आहे. विभाकर मोडक हे हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष व अहमदनगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांचे धाकटे बंधू होते.

## महेश दुडगू यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तोफखान्यातील नवरंग व्यायामशाळेजवळ राहणारे महेश रमेश दुडगू (वय ४८) यांचे २५ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## निर्मलबाई कुमार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तारकपूर, सिंधी कॉलनी येथील रहिवाशी निर्मलबाई बिहारीलाल कुमार (वय ७७) यांचे २४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २५ नोव्हेंबर रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, नाती असा परिवार आहे. राजन कुमार, ॲड. सुजाता कुमार, लता गुलाटी यांच्या त्या मातोश्री होत.

## अनुसयाबाई जगधने यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील अनुसयाबाई वसंतराव जगधने (वय ८९) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर न.प.च्या माजी उपनगराध्यक्षा सौ.सुनंदा जनार्दन जगधने यांच्या सासुबाई, उक्कलगाव येथील प्रगतशील शेतकरी श्रीकांत जगधने, जनार्दन जगधने व संजय जगधने यांच्या मातोश्री होत.

## सौ.गंगावती शेलार यांचे हृदविकाराने निधन




श्रीरामपूर – येथील सौ. गंगावती गोरक्षनाथ शेलार (वय ६७) यांचे हृदविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मुळा प्रवराचे माजी कर्मचारी गोरक्षनाथ रायभान शेलार यांच्या पत्नी, संजय व गणेश शेलार यांच्या त्या मातोश्री होत.

## भाऊसाहेब (दादामामा) पाऊलबुध्दे यांचे निधन



श्रीरामपूर – येथील उंदिरगावचे माजी सरपंच भाऊसाहेब (दादामामा) मारुती पाऊलबुध्दे (वय ८८) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी संजय पाऊलबुध्दे यांचे वडील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊबुध्दे यांचे चुलते, चि.कार्तिक व रणविर यांचे आजोबा होत.

## शामलाल रंगवाणी यांचे हृदयविकाराने निधन



छत्रपती संभाजीनगर – आकाशवाणी येथील रहिवासी शामलाल जयरामदास रंगवाणी (७४) यांचे हृदयविकाराने २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता निधन झाले. त्यांच्यावर २४ नोव्हेंबर रोजी कैलास नगर स्मशानभूमीत सकाळी १० वाजता अत्यंसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# आ.संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांचे श्री विशाल गणेशाला साकडे

### मतीमंद मुलांच्या निवासी शाळेत पार पडली आरती

नगर – नगर शहर विधानसभा मतदार संघात मताधिक्याने निवडून आलेले महायुतीचे आ. संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांनी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेशाला साकडे घालून आरती केली. तपोवन रोड येथील मतीमंद मुलांच्या निवासी शाळेत झालेल्या आरतीप्रसंगी दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

नचिकेत बाबासाहेब बोडखे या दिव्यांग विद्यार्थ्याने पहिल्यांदाच आपला मतदानाचा हक्क बजावला होता. तर या निवडणुकीत निवडून आलेले आ. जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी नचिकेत बोडखे याच्या हस्ते मतीमंद मुलांच्या शाळेत आरती पार पडली.



आ. संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी दिव्यांग विद्यार्थी श्री विशाल गणेशाला आरतीद्वारे साकडे घालताना तपोवन रोडवरील नचिकेत बोडखे, समवेत प्रा. माणिकराव विधाते, बाबासाहेब बोडखे आदी.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, सीए अभिजीत विधाते, संजय शिरसाठ, धनगरवाडी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका रेणुका बोडखे, विराज बोडखे, प्रतिक्षा शिरसाठ, श्रुतिका शिरसाठ, कृष्णा शिरसाठ, उत्तर महाराष्ट्र केसरी पै. प्रताप गायकवाड, अक्षय चाफेकर आदी उपस्थित होते.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, दिव्यांग विद्यार्थ्यांना देखील आ. संग्राम जगताप यांच्या मंत्रीपदासाठी ओढ लागली आहे. आ. जगताप यांनी सर्वसामान्यांपासून ते दिव्यांगांच्या विकासासाठी देखील शहरात महत्त्वपूर्ण कामे केली. शहराच्या इतिहासात सर्वाधिक निधी आणणारे आमदार म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. विकासाचे व्हिजन ठेऊन त्यांनी केलेल्या कामाला यापुढे अधिक गती मिळणार आहे. तर त्यांच्या माध्यमातून मेट्रो सिटीचे स्वप्न साकारले जाणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

प्रा. माणिक विधाते यांनी नगरकरांनी लोकप्रतिनिधी नव्हे तर, जनसेवक निवडला आहे. खरे काम करणाऱ्या व व्हिजन असलेल्या लोकनेत्याला निवडून दिले. त्यांचे नेतृत्व शहराला विकासाकडे घेऊन जाणारे आहे. सर्वांच्या प्रेमामुळे त्यांना मताधिक्य मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

बोडखे परिवाराच्यावतीने मतीमंद मुलांच्या निवासी शाळेला सहा महिने पुरेल इतके अन्न–धान्यासह फळे, भाजीपाला देण्यात आला. तर विद्यार्थ्यांना मिठाई व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांना मंत्रिमंडळात स्थान द्या



नगर – नुकत्याच निवडणूका झाल्या असून बहूमतात आलेल्या महायुती सरकारच्या सत्तास्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. या अनुषंगाने नव्याने गठीत होणाऱ्या मंत्रिमंडळात पक्षाच्या माध्यमातून वंचित घटकांना न्याय देणारे पीपल्स रिपब्लीकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांना मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणी पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड यांनी पत्रकाव्दारे केली आहे.

पत्रकात पुढे नमूद करतांना सुमेध गायकवाड म्हणाले की, मागील लोकसभा आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत पीपल्स रिपब्लीकन पार्टी महायुतीसोबत होती. या दोन्ही निवडणूकीत राज्यात पक्षाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम करुन महायुतीचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून दिले आहेत. महायुतीच्या या यशात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा लाँगमार्च प्रणेते प्रा. जोगेंद्र कवाडे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांचा सिंहाचा वाटा आहे. ऐन निवडणूकीत अपघात झाल्यानंतरही जयदीप कवाडे हे संपुर्ण महाराष्ट्रात महायुतीच्या प्रचारासाठी फिरले. या नेत्यांच्या कार्याची दखल घेवून महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांना नव्याने गठीत होणाऱ्या मंत्रिमंडळात मानाचे स्थान देवून त्यांचा कार्याचा सन्मान करावा अशी मागणी पत्रकाव्दारे केली आहे. तसेच जिल्ह्यातील महायुतीचे उमेदवार निवडून येण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी मोठे परिश्रम घेतले आहे. त्यामुळे जिल्हानिहाय समित्यावर देखील कार्यकर्त्यांची वर्णी लावावी अशी ही मागणी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुमेध गायकवाड, संपर्क प्रमुख नितिन कसबेकर, महिला जिल्हाध्यक्षा सौ. गौतमीताई भिंगारदिवे, विशाल गायकवाड, नितीन साळवे, रौफ कुरेशी, विलास गजभिव, मधुकर पवसे, संजय उन्हवणे, अनिल पलघडमल, संजय साळवे, किरण गायकवाड, यादव त्रिभुवन, महेंद्र साळवे, कमलेश साळवे, सिद्धार्थ राजगुरु, शाहिद शेख आदी प्रमुख कार्यकर्ते यांनी केली आहे.



### महात्मा फुले चौकातील अपघातात मयत तरुणाच्या कुटुंबियांची आ.संग्राम जगताप यांनी घेतली भेट

शहरातील महात्मा फुले चौकामध्ये २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी चारचाकी चालकाचा आपल्या गाडीवरील ताबा सुटला आणि त्याने रस्त्याच्या बाजूला उभ्या असणाऱ्या नागरिकांना चिरडल्याची घटना घडली. यामध्ये सारसनगर येथील कानडे मळ्यातील रवींद्र रमेश कानडे या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान आमदार संग्राम जगताप यांनी घटनेची माहिती मिळाल्यानंतर कानडे कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले. या प्रकरणी वाहनचालकावर कडक कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. अशा घटनेमध्ये एखाद्या कुटुंबातील कर्ता पुरुष दुर्दैवी मृत्युमुखी पडल्यास त्या कुटुंबावर मोठे संकट कोसळत असते, त्यांचा आधार निघून जातो. अशा घटना वारंवार घडण्याचे प्रमाण वाढले असून, याबाबत विविध उपाययोजना होणे गरजेचे आहे. यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला जाईल, असे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

# गुलमोहर रोडवर घर फोडून चोरी

### सव्वा किलो चांदीच्या वस्तू चोरट्यांनी पळविल्या

नगर – सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवर किर्लोस्कर कॉलनीत असलेल्या अमेय हाऊसिंग सोसायटी मधील सेवानिवृत्त वृद्धाचे घर अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी फोडून सुमारे सव्वा किलो वजनाच्या चांदीच्या विविध वस्तू चोरून नेल्या आहेत. रविवारी (दि.२४) रात्री ९ ते सोमवारी (दि.२५) सकाळी ८ या कालावधीत ही घटना घडली.

याबाबत विवेक मधुकर रणभोर (वय ६८, रा.अमेय हाऊसिंग सोसायटी, किर्लोस्कर कॉलनी, गुलमोहर रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अज्ञात चोरट्यांनी रविवारी (दि.२४) रात्री ९ ते सोमवारी (दि.२५) सकाळी ८ या कालावधीत फिर्यादी यांच्या घराच्या हॉलच्या दरवाजाचे कुलूप कशाच्या तरी सहाय्याने तोडून घरातील चांदीचा हार, माणिक खड्यासह असलेली अंगठी, २ टोप, चांदीच्या पादुका, चिलीम अशा सुमारे सव्वा किलो वजनाच्या विविध वस्तू चोरून नेल्या आहेत. चोरीची घटना निदर्शनास आल्यावर त्यांनी तोफखाना पोलिसांशी संपर्क साधत फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये मद्यधुंद कारचालकाने चार जणांना उडवले, एकाचा मृत्यू

### तीन जण जखमी, मार्केट यार्ड जवळील महात्मा फुले चौकातील घटना



रवींद्र कानडे (मयत)

नगर – शहरातील मार्केटयार्ड परिसरातील महात्मा फुले चौकात भरधाव वेगात असलेल्या मद्यधुंद कार चालकाने चौघांना उडवले. एका चारचाकीसह काही दुचाकींनाही धडक दिली. यात एकाचा मृत्यू झाला, तर तीन जखमी झाले. सोमवारी (दि.२५) सायंकाळी ही घटना घडली. सदर घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे.

अपघातात रवींद्र रमेश कानडे (वय ३२, रा. कानडे मळा, सोलापूर रस्ता) हे मयत झाले आहेत. तर, रोहित संतोष मांजरे (वय १७, रा. वृंदावन कॉलनी), जय अशोक जाधव (रा. पारगाव, वाळूंज) व आसाराम तुळशीराम शिंदे (वय ४९, रा. कानडे मळा, सोलापूर रस्ता) हे तिघे जखमी झाले आहेत. कोतवाली पोलिसांनी कार चालक राजू विठ्ठल खांदवे (वय ४५, रा. सांडवे, ता.नगर) याला ताब्यात घेतले आहे.



महात्मा फुले चौकात अपघातानंतर तेथे जमा झालेली गर्दी. (छाया – बबलू शेख)

सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास महात्मा फुले चौकातील एका पानाच्या दुकानाजवळ चौघे उभे होते. यावेळी सहकार सभागृहाकडून येणाऱ्या रस्त्यावरून महिंद्रा एक्सयुव्ही ही कार (क्र.एमएच १६ बीझेड २९२९) वेगात आली. काही कळायच्या आतच कारने एक दुचाकी व चौघांना उडवले. पुढे जाऊन कारचालकाने एका कारला धडक दिली. घटनास्थळी नागरिकांनी धाव घेत जखमींना रुग्णालयात दाखल केले.

माजी जि. प. सदस्य सचिन जगताप व माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी घटनास्थळी धाव घेऊन रुग्णालयात जखमींची चौकशी केली. कोतवाली ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांच्यासह पथकाने घटनास्थळी जावून मद्यधुंद कारचालकाला ताब्यात घेतले. या घटनेची माहिती मिळाल्यावर आ.संग्राम जगताप यांनी कोतवालीचे पो.नि. प्रताप दराडे यांच्याशी संपर्क साधून गुन्हा दाखल करताना आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा होईल अशी कलमे लावावीत अशा सूचना केल्या.

याबाबत मयत रवींद्र कानडे यांचे चुलते नंदू दौलत कानडे (वय ६४) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी कार चालक राजू खांदवे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०५, ११०, ३२४ (४), ३२४ (५) मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

मयत रवींद्र कानडे यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, आई वडील, विवाहित बहिणी असा परिवार आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जळालेल्या त्वचेवर हे उपाय करा

* केळीची साल त्वचेवर लावल्याने आराम मिळतो, याला तोपर्यंत लावून ठेवावे जोपर्यंत त्वचा काळी पडत नाही.

* भाजलेल्या त्वचेवर दहीसुद्धा लावू शकता, पण लगेच लावू नये, अर्धा तासाने लावावे.

## पाककला

### चॉकलेट बिस्किट

**साहित्य** – मैदा १ किलो, पिठीसाखर ५०० ग्रॅम, लोणी ५०० ग्रॅम, चॉकलेट सॉस गरजेनुसार.

**कृति** – मैदा व साखर चाळून घ्या व लोण्यासोबत मळून घ्या. मैद्याची बिस्किटे बनवा व ती ओव्हन ट्रेत मांडा. २०० डिग्रीवर प्रथम ओव्हन तापवून ठेवा व त्याच तापमानावर बिस्किटे आत ठेवा.

गुलाबीसर झाल्यावर बाहेर काढा. चॉकलेट सॉसमध्ये बुडवून काढा.

## सौंदर्य

### त्वच्या उजळण्यासाठी

गळा, मान येथील त्वचेची स्वच्छता करण्यासाठी हळद + लिंबू रस + दूध यांचे मिश्रण करून त्वचेवर चोळावे. याने त्वचा उजळते.

## सल्ला

डोळ्यांना आराम मिळण्यासाठी कापडी घडी बर्फाच्या पाण्यात बुडवून ही पट्टी डोळ्यावर ठेवावी.

## वास्तू

घरातील वस्तूंचे स्वतःचे योग्य असं स्थान असते. त्या ठिकाणीच त्या असाव्यात. वाटेल तिथे वस्तू ठेवल्यास आपल्या आयुष्यावर त्याचा नकारात्मक परिणाम पडू शकतो. अशामुळे मनःशांती ढळते. जर घरामधील पलंग दाराजवळ ठेवला असेल तर रात्री शांत झोप लागत नाही. सतत बेचैन वाटत राहते. रात्रीची झोपही पूर्ण होत नाही. म्हणून दरवाज्याजवळ पलंग कधीही नसावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, चित्रा अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. अधिक खर्च होईल. वाहने व यांत्रिक उपकरणे जपून चालवावीत. कुटुंबियांचा चांगला सहवास लाभेल.

**मिथुन** : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपण कुणापासून प्रेरीत व्हाल. पत्नीकडून उत्तम वैवाहिक सुख प्राप्त होईल.

**कर्क** : आजचा दिवस छान जाईल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**सिंह** : योजनाबद्धरीत्याने आपले काम करण्याचा प्रयत्न करा. छोट्या-छोट्या अडचणी येतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल.

**कन्या** : मनोरंजनावर खर्च होईल. शेजारी व कार्यालयीन सहकार्यांबरोबर तंटा करू नका. प्रेमसंबंधात यश मिळेल.

**तूळ** : काळजीपूर्वक कार्य करा. पळापळ अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या.

**वृश्चिक** : संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. आज आपणास कामाचा शिण येवू शकतो.

**धनु** : आपण अशा लोकांपेक्षा निराळ्या मार्गावर चालण्याची इच्छा ठेवता ज्यावर आपले सहकर्मी आपल्याबरोबर असतील. मात्र अडचणी आपला पिच्छा सोडत नाहीत.

**मकर** : थंड आणि शांत राहाण्याचा प्रयत्न करा. आर्थिक स्थितीमध्ये हळू-हळू सुधारणा येईल. जुन्या मित्रांचा सहवास आनंददायी ठरेल.

**कुंभ** : आपण नव्या ग्राहकांना व प्रख्यात लोकांना भेटाल. शेवटी नव्या योजना आणि प्रकल्प कार्यान्वित करणे आपल्यासाठी श्रेयस्कर ठरेल.

**मीन** : पैसे मिळवण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. आपण इतर लोकांना देखील यासाठी तयार करू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


वडील (मुलाला) : तू मघापासून कोंबडा का झाला आहेस?
मुलगा : बाबा, तुम्हीच तर म्हणाला होतात ना की जे काम शाळेत करशील तेच घरातही अर्धा तास करत जा म्हणून!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* सायबर गुन्हा कशावरुन घडतो? – संगणक
* 'समिती' हे नाव कोणत्या प्रकारचे आहे? – सामान्यनाम
* 'हात ओला तर मित्र भला' म्हणीचा अर्थ? – फायदा असेल तरच लोक जवळ करतात
* 'औरंगाबाद' या शब्दाची विभक्ती? – द्वितीया
* 'बारभाई' या शब्दाचा समास कोणता आहे? – द्विगू समास

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०५८ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) एक फूल ४) पुन्हा पुन्हा ६) फुटून जोराने बाहेर आलेला ८) नूतन; नवीन ९) मोकळीक; स्वातंत्र्य १२) सोटा; काठी १४) आयात होणाऱ्या मालावरील कर १७) येणे जाणे; राबता; शेतजमीन १९) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते पात्र २१) फिरस्ता; गोसावी २२) सटसटीत एकेरी अंगाचा; काटकोळा २३) माणसे; लोक

**उभे शब्द :-** १) एक भाजी २) दुर्दशा; दैना ३) सोवळ्याचे रेशमी वस्त्र ४) शेपटी असलेला काळ्या तोंडाचा एक प्राणी ५) वाद्य वाजविण्याची क्रिया ७) बाह्यस्वरूप; सौंदर्य; मूळ स्वभाव; आकार; आकृती १०) वेगाने वाहणारी हवा; पवन ११) गेय काव्य; गान; गाणे १३) भाजीचा एक लाल कंद १५) तगमग; तडफड; अस्वस्थता १६) अंगाला शेंदूर फासून मरीआईच्या नावाने भिक्षा मागणारा १८) बैलाच्या मानेवरचा उंचवटा २०) विष्णूचा पाचवा अवतार २१) मग्न; लीन; रममाण

### शब्दगंध क्र. ७०५७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भी | ती | ■ | आ | ग | म | न | ■ |
| म | न | स | ब | दा | र | ■ | मा |
| प | ■ | र | ■ | ■ | वा | र | स |
| ला | म | ण | दि | वा | ■ | ब | ला |
| श | त | ■ | न | ड | ■ | र | ■ |
| ■ | ल | स | ■ | गा | ज | ■ | हा |
| खं | बी | र | ■ | ■ | मा | न | व |
| ड | ■ | स | ड | पा | त | ळ | ■ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अहंकारापेक्षा नम्रतेचे मोल महान आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### विजेचा शॉक बसल्यास काय होते?

लहान मुले फार उद्योगी असतात. त्यांच्या काहीतरी कारवाया चालू असतात. विजेच्या उपकरणांशी खेळणे तर मुलांना फारच आवडते. इकडचा बल्ब काढून दुसरीकडे लाव, असली काही कामे करायला मुले नेहमीच तयार असतात. कधी कधी मात्र या गोष्टी अंगलट येतात. जुनाट वायरवर ओले कपडे वाळत घालणे, प्लगमध्ये खिळा घालणे, बल्ब होल्डरमध्ये बोट घालणे इत्यादीमुळे विजेचा शॉक बसतो. विजेचा शॉक बसला नाही, असा माणूस सापडणे अवघडच आहे. पाणी तापवण्यासाठी बऱ्याच घरात वापरल्या जाणाऱ्या इमर्शन रॉडचे बटण चालू असताना पाण्यात हात घातला तरी शॉक बसतो.

विजेचा शॉक हा तसा आपल्याला बारीकसा वा दोन मिनिटे झिणमिण्या आणणारा अपघात वाटला, तरी प्रत्यक्षात मात्र तो जीवघेणा असा गंभीर अपघात ठरू शकतो. आकाशात चमकणारी वीज कोणाच्या अंगावर पडली, तर ती व्यक्ती वाचत नाही. तिचा जळून अगदी कोळसा होऊन जातो. घरगुती विजेमुळे मात्र कमी-अधिक शक्तीचे धक्के बसू शकतात. डीसी वीज ही एसीपेक्षा जास्त घातक असते. महाराष्ट्रात जवळपास सगळीकडची वीज एसी आहे. आकाशातून पडणारी वीज मात्र डीसीप्रमाणे कार्य करते.

विद्युत धक्क्याचे व शॉकचे दोन प्रकारे परिणाम होतात. एक म्हणजे भाजणे व दुसरे म्हणजे मज्जासंस्था, स्नायू व हृदय यांच्यावर विद्युतप्रवाहाचा परिणाम होणे. विद्युतधक्क्यामुळे हृदयाची गती अनियमित होण्याची किंवा हृदय बंद पडण्याची शक्यता असते.

शॉकमुळे स्नायू अचानक आकुंचन पावतात व त्यामुळे दूर फेकले जाणे, खाली पडणे अशा मोठ्या हालचाली होऊ शकतात. विजेचा शॉक खूप मोठा असेल, तर बेशुद्धी येते किंवा मृत्यूही ओढवतो. वीज आणि विकास यांची सांगड आहे, हे आपण औद्योगिक क्रांतीपासून अनुभवतोय. पण वीज आणि विनाश यांच्या परस्परसंबंधाची जाणीव आपल्याला अपघातातून अधूनमधून होत असते. वीज हे दुधारी शस्त्र आहे. त्यामुळे त्याचा वापर करताना नीट काळजी घेणे अगत्याचे आहे, अन्यथा जीवावर बेतू शकते.

## श्रेष्ठ कोण?

एक माणूस अरण्यात फिरत असता तेथे त्याची एका सिंहाशी भेट झाली. त्यावेळी त्या दोघांनी निरनिराळ्या विषयांवर बऱ्याच गप्पा मारल्या व त्यामुळे ते दोघे एकमेकांस आवडू लागले.

शेवटी मात्र ते 'माणूस श्रेष्ठ की, सिंह श्रेष्ठ?' या विषयावर बोलू लागले व त्याचे वादात रूपांतर झाले. ते दोघेही भांडू लागले. नुसत्या बोलण्याने माणसाचे श्रेष्ठत्व त्या माणसास सिध्द करता येईना. तेव्हा त्याने आपल्याजवळ असलेले शिल्प त्याला दाखविले.

सिंहाची आयाळ हातात धरून त्याच्या पाठीवर एक माणूस आहे असे ते शिल्प होते. ते पाहून सिंह त्याला म्हणाला, 'ज्याने हे शिल्प तयार केले तो मनुष्य होता, तोच जर सिंह असता तर माणसाच्या छातीवर बसून सिंह त्याला मारतो आहे, असे त्याने दाखविले असते.'

**तात्पर्य :** ज्याच्या त्याच्या परीने जो तो श्रेष्ठच असतो. प्रत्येकाच्या जीवनातील परिस्थिती ही वेगवेगळी असते.



## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

### जीवन की रोशनी

कबीर साहब भी हमें बताते हैं:–

वस्तु कहीं ढूँढें कहीं किहि विध आवे हाथ। कहे कबीर तब पाईयै जब भेदी लीजे साथ ।। भेदी लिया साथ कर दीनी वस्त लखाय ।

कोट जनम का पंथ था
पल में पहुँचा जाय ।।

(कबीर साहिब)

तुम सच को वहाँ से, जहाँ वह नहीं है कैसे ढूंढ सकते हो। सच को वहाँ ढूंढो जहाँ वह विराजमान है। सच को जानने वाले को पकड़ो, वह तुम्हें पल भर में १९ ले जायेगा।

इस तरह आत्म-ज्ञान प्राप्त करने का यह मार्ग देखने में लम्बा, दुर्गम दिखने वाला परन्तु सन्त सत्गुरु की बख्शिश द्वारा छोटा हो जाता है। वह तीसरा तिल खोलने रूपी जादू की छड़ी प्रदान करता है और शिष्य की पहुँच अगम अगोचर तक हो जाती है।

सत् लोक के उपरि धावै ।।
अलख अगम की तब गत पावै ।।
तिस ते उपरि संतन धाम ।।
नानक दास कीओ बिसराम ।।

अर्थात् जो सत लोक से पार जाकर अगम अलख को जानता है और इससे ऊपर, सन्तों के धाम, अनाम तक पहुँचता है। नानक दास का वहाँ शान्तिपूर्ण निवास है।

इसी तरह हम देखते हैं कि जो कोई जीते जी इच्छा से मरना सीख ले, जन्म मरण के चक्र से मुक्त होकर अमर जीवन को प्राप्त कर लेता है। इसी लिए सन्त ऐसी मौत के इतने गुण गाते हैं और हमें अमली तौर पर, भिन्न-भिन्न मण्डलों पर चढ़कर और पार जाकर ईश्वरीय राज्य जो हमारा जन्म सिद्ध अधिकार है परन्तु इस समय हम से है, में प्रवेश करने की अमली शिक्षा देते हैं। उनकी शिक्षाओं को सुनकर, लुप्त हो चुका मानकर और स्वीकार करके तथा फिर उनके आदेशानुसार इन पर चलकर यह हमारी पकड़ में आ सकता है।

मृत्यु के बाद हम में से हर एक ने अन्धों की तरह अकेले और विवशता की अवस्था में जाना है। सारे संसार के धर्म ग्रन्थ इस संसार में जीवन और मृत्यु की सीमा पार करने और फिर दूसरी ओर मृत्यु और जीवन की बड़ी महानता बयान करते हैं।

मुइया जितु घरि जाईयै तित जीव दिया मरु मारि।।

(सिरि राग मः १)

अर्थात् जिस घर में मर कर जाना है, जीते जी क्यों नहीं वहाँ स्थापित हो जाते।

नानक जीवतिया मरि रहीयै
ऐसा जोगु कमाईयै ।।

(सूही मः १)

अर्थात् ऐ नानक, असली योग जीते जी मरने का अभ्यास करना और इसमें स्थित हो जाना है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### अंतरीक बल

यही नियम राज़योगियों पर भी लागू होता है जिन का योग नहीं लगता है या मुरली पढ़ने को मन नहीं करता। समय प्रबन्धन और अस्त व्यस्त

कोई भी चीज हो उसे अपने स्थान पर रखो। कापी कहीं, पेन कहीं, एक जूराब जूते के अंदर, दूसरी टेबल पर, ऐसी अस्त व्यस्त हालात न हो। याद नहीं आ रहा विज्ञान के नोट्स किस को दिए।

हरीश की बुक लौटानी है यह याद नहीं रहा। लायब्रेरी की बुक समय

पर जमा करना भूल गये, उस पर जुर्माना देना पड़ा। अव्यवस्ता का है। उन कार्यों की वजह से आप की पढाई यां साधना बाधित होती है। मक्कड़ जाल हम स्वयं बुनते हैं। किताब और कपियों के लिये जगह दसरे कार्य होते हुए भी आप को पढ़ना है। आप को बस या ट्रैन में निर्धरित करनी चाहिए। जरूरी कागजो के लिये फाइल बनाए।

यात्रा करते समय में पढ़ना है, डाक्टर के पास अपनी बारी के इंतजार

महत्वपूर्ण बातो को डायरी में लिखने की आदत डालो। जो चीज जहाँ करते समय पढ़ना है, रात को जाग कर या सुबह उठ कर पढ़ना है।

रहती है उसे तुरंत वहां रखिए। महीने- दो महीने बाद अपने कागजो को छांटना चाहिए। व्यवस्थित होने से आप के पास अपार समय बचेगा और मानसिक शांति भी बनीं रहेगी।

हमें बहुत से काम घर के और बाहर के करने पड़ते हैं। हमें नहाना, धोना, भोजन खाना तथा सब्जी आदि लाने के लिये बाहर जाना पड़ता है। सदा सोचते रहा करो इन कामों को जल्दी और बढ़िया ढंग से कैसे कर सकता हूं। आप एक स्थान से दूसरे स्थान पर पैदल जाते हैं। आप साइकल, स्कूटर का प्रयोग करके समय बचा सकते हैं। भोजन खाने में १५ मिनिट से ज्यादा नहीं लगना चाहिए। इस समय को बचाए ।

आप को हर कोई अपनी और खींचने को आतुर रहता है। फिल्मो की दुनिया में बे मतलब के फितूर, बाजार की चकाचौंध तथा कथित प्रेम, अनेक तरह के व्यसन, अगर इन किसी की लत लग गई तो जान छुड़ाना मुश्किल होगा। आप वही बन जाते हैं जो आप की गहरी आकांक्षा होती है। हमारी इच्छा तो होती है पर गहरी नहीं। हम टाप आना चाहते हैं। हम ऑफिसर बनना चाहते हैं। हम सर्व गुण सम्पन्न बनना चाहते हैं। हम अष्ट रत्नो में आना चाहते हैं। परंतु यह सरसरी इच्छा रखते हैं। अगर हम ठान लें कि मुझे यह बनना हमारा दिमाग जी जान से पढ़ने में लगने लगता है। विद्यार्थी जीवन १५-२० वर्ष का होता है। इस जीवन में और बहुत से कार्य आ जाते है। तब जब लोग मौज मस्ती करने के लिये सैर सपाटे पर होते हैं, तब आप

घर में बैठ कर पढ़ा करो। यही आप की नीति और रीति होनी चाहिए। कभी भी 'कर लेंगे', यह शब्द प्रयोग नहीं करना। यह 'कभी' कभी आती ही नहीं। एक तिथि फिक्स करो कि फलानी तारीख तक यह कर लूंगा। परीक्षा की डेट घोषित हो जाने पर हम पढ़ाई की ओर विशेष ध्यान देते हैं। कोई उत्सव की डेट फिक्स होते ही हम जोर शोर से तैयारी करते हैं। हम भोजन हर रोज खाते है, हम और मनोरंजन एक सीमा तक ही ठीक है। सोते हर रोज हैं, ऐसे ही हमें पढ़ना भी हर रोज हैं। समाजिक जीवन समय प्रबन्धन और मस्तिष्क जब हम सो जाते हैं तो दिमाग की कोशिकाएं स्वंय को पुनर्जीवित करती हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

यानंतर सरस्वतीची प्रार्थना करावी. सरस्वती स्तोत्र म्हणावे. विद्येची देवता सरस्वतीचा सरस्वती मंत्र :

नमस्ते शारदे सरस्वती मतिप्रदे।
वसत्वं मम जिव्हाग्रे सर्वविद्या प्रदाभव।।

सरस्वती स्तोत्र :

या कुन्देन्दुतुषारहार धवला या शुभ्रवस्त्रावृता।
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेत पद्मासना।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा।।

यानंतर, गुरुदेवतेची प्रार्थना करावी व तसेच ब्रह्मा, विष्णू व महेश यांची प्रतिमा एकत्र दिसणाऱ्या श्री दत्तगुरूंची प्रार्थना करावी.

**श्री गुरूभ्यो नमः।। गुरूब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरूः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।**

**दिगंबरा, दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा** (३ वेळा म्हणावे) हे गुरुदेवा, तुम्हाला आम्ही नमस्कार करतो. जीवनामधील सर्व दुःखांवर विजयाचा मार्ग आम्हाला तुम्हीच दाखविता.

**हे गुरुदेव हम सब को सद्बुध्दि दे।**

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

**सत्कर्तव्य करने की प्रवृत्ति दे।**

यानंतर, सर्व विश्वाला त्याच्या तेजाने उजळून टाकणाऱ्या सूर्यदेवाची प्रार्थना करावी.

**ॐ सूर्याय नमः । ॐ भास्कराय विदम है ।**
**दिवाकराय धीमहि । तन्नो आदित्य प्रचोदयात्।।**

हे सूर्यदेवा, तुझ्यासारखे माझे बाळ तेजस्वी होऊ दे. तुझ्यासारखीच त्याची कीर्ती दशदिशांना होऊ दे व माझ्या गर्भावस्थेसाठी तुझा आशीर्वाद असू दे. यानंतर गायत्री मंत्राची उपासना करावी.

**गायत्री मंत्र –**

**ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं।**
**भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्।**

हे ईश्वरा! सर्वश्रेष्ठ तेजस्वरूपा आम्ही तुझे ध्यान करतो. आम्हा सर्वांच्या बुद्धीस सन्मार्ग व शुभकार्यासाठी प्रज्वलित कर. गायत्री मंत्रामुळे घरातील वातावरण प्रसन्न राहते. यानंतर, आयुर्वेदाची देवता श्री धन्वंतरीची बाळाच्या व गर्भवती मातेच्या आरोग्यासाठी प्रार्थना करावी.

**श्री धन्वंतरी मंत्र –**

**ॐ नमो भगवते वासुदेवाय धन्वंतरये अमृतकलश हस्ताय । सर्वामयविनाशाय त्रैलोक्यनाशाय महाविष्णवे स्वाहा।।**

**सर्व रोगनाशक मंत्र –**

**अच्युत अनंत गोविंद नामोच्चारण भेषजात।**
**नश्यन्ति सकल: रोग: सत्यम् सत्यम् वदाम्यहम्।।**

अशा रीतीने, धन्वंतरी देवतेजवळ गर्भावस्थेत कुठलाही रोग होऊ नये व आरोग्य चांगले राहावे म्हणून विनंती करावी.

**गर्भ संरक्षण मंत्र –**

आयुर्वेदामध्ये गर्भाचे रक्षण होण्यासाठी काही मंत्र सांगितले आहेत. गर्भधानविधीच्या वेळेस या मंत्राचा उच्चार करावा. तसेच, पुढे गर्भावस्थेत देखील हे मंत्र म्हणावेत.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# एक्सलन्स अचिव्हर्सने पटकाविले अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग स्पर्धेचे अजिंक्यपद

नगर – शहरातील नगर क्लबच्या मैदानावर रंगलेल्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग स्पर्धेचे अजिंक्यपद एक्सलन्स अचिव्हर्स संघाने पटकाविले. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे हे तीसरे पर्व होते.

अंतिम फेरीत दाखल झालेले एक्सलन्स अचिव्हर्स विरुध्द आरडीएक्स ज्युनियर या संघामध्ये अंतिम सामना रंगला होता. रात्रीच्या गुलाबी थंडीत मैदान फुटबॉलच्या रंगतदार सामन्याने तापले होते. या अटातटीच्या सामन्यात दोन्ही तुल्यबळ संघ एकमेकांना भिडले होते. दोन्ही संघाच्या आक्रमक खेळीनंतरही पहिल्या हाफमध्ये एकही गोल झाला नाही. दुसऱ्या हाफमध्ये एक्सलन्स अचिव्हर्स कडून वंश फिरोदिया यांनी केलेला १ गोल संघाच्या विजयासाठी निर्णायक ठरला. १–० गोलने एक्सलन्स अचिव्हर्सने विजेतेपद पटकाविले. यावेळी विजेत्या संघातील खेळाडूंनी संगीताच्या तालावर ठेका धरत व फटाक्यांच्या आतषबाजीत मैदानात एकच जल्लोष केला.

पारितोषिक वितरणासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे कर्नल ओमपाल सिंग, खेलो इंडिया फुटबॉलचे संस्थापक सदस्य हितेश जोशी, क्रीडा प्रबोधिनी बालेवाडीचे फुटबॉल प्रशिक्षक धीरज मिश्रा, नमोह फुटबॉलच्या नमिता फिरोदिया, जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे सहसचिव गोपीचंद परदेशी यांच्या हस्ते विजयी, उपविजयी व उत्कृष्ट खेळाडूंना बक्षीस व चषक प्रदान करण्यात आले.

हितेश जोशी म्हणाले की, नगर शहराच्या ग्रासरुटमधून फुटबॉल खेळाडू पुढे येत आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या योगदानाने या खेळाला चालना मिळाली आहे. तर या स्पर्धेतून खेळाडूंना स्वत:ची गुणवत्ता सिध्द करण्याची संधी मिळत आहे. फुटबॉल हे एक जग असून, जगाच्या पातळीवर हा खेळ खेळला जातो. यामध्ये करिअरच्या उत्तम संधी असल्या तरी खेळाडूंनी आपले करिअरचे इतर ध्येय देखील समोर ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले.




नगर क्लब मैदानावर झालेल्या अहिल्यानगर फुटबॉल सुपरलीग स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावलेला एक्सलन्स अचिव्हर्स संघास पारितोषिक प्रदान करताना प्रमुख पाहुणे कर्नल ओमपाल सिंग. समवेत हितेश जोशी, धीरज मिश्रा, नमिता फिरोदिया आदी. दुसऱ्या छायाचित्रात अंतिम सामना खेळताना खेळाडू.

## मुलींसाठी नगर अहिल्या चषक व मुलांसाठी नमोह युथ चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेची घोषणा

तर नाशिक येथे होणाऱ्या वेस्टर्न झोनलसाठी निवड झालेल्या शहरातील खेळाडूंची नावे जाहीर केली.

कर्नल ओमपाल सिंग यांनी जिकण्यापेक्षा स्पर्धेत उतरणे महत्त्वाचे असते. स्पर्धेतून आपल्यातील कौशल्य व शक्तीचे परीक्षण करुन पुढील वाटचाल ठरविता येते. निरोगी व सशक्त पिढीतून भारताचे उज्वल भविष्य घडणार असल्याचे स्पष्ट करुन, त्यांनी पितृभक्ती, गुरूभक्ती व देशभक्ती जीवनात श्रेष्ठ असल्याचे सांगितले. धीरज मिश्रा म्हणाले की, नगर मधील खेळाडू आपली गुणवत्ता सिध्द करत आहे. अनेक उत्कृष्ट खेळाडूंनी आपली मोहर राज्य स्पर्धेत उमटवली आहे. या मातीतला खेळाडू देशासाठी नक्कीच खेळेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नमिता फिरोदिया म्हणाल्या की, शहरात फुटबॉल खेळाला चालना देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लबच्या माध्यमातून ५० पेक्षा अधिक स्पर्धा घेऊन अनेक प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून खेळाडू घडविण्याचे काम करण्यात आले आहे. तर यामध्ये सातत्य ठेऊन नवीन वर्षात अजून नवीन स्पर्धा घेतली जाणार असल्याचे सांगून, त्यांनी मुलींसाठी नगर अहिल्या चषक व मुलांसाठी नमोह युथ चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धांची घोषणा केली.

दोन दिवस-रात्र सलग फुटबॉल सुपर लीग स्पर्धेत फुटबॉलचे सामने रंगले होते. या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून वेदांत काळे, रनवीर म्हस्के, जैद शेख, सिध्दांत गांधी, साहिल कुसळकर, वीर छल्लाणी, आतीष उरमुडे, शुभंकर सावंत तसेच बेस्ट गोलकिपर– वंश छल्लाणी, बेस्ट डिपेन्डर– जसवीर ग्रोवर व टॉप गोल स्कोरर– वंश फिरोदिया यांना सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी आदित्य जाधव या खेळाडूने सादर केलेल्या फुटबॉलच्या कवायतीने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी फुटबॉल संघ मालक संघ मालक दर्शन भंडारी (जीसी फायटर्स), सागर कायगावकर (एसजीके गोल्ड स्टार), जोएब खान (गुलमोहर चॅलेंजर्स), अभिनंदन भन्साळी (अवित्री वेलोसिटी किंग्स), प्रणिल मुनोत (कॉन्प्लेक्स सुपर हीरो), चेतन गांधी (गांधी वॉरीअर्स), ऋतविक वाबळे (आरडीएक्स ज्युनियर), आशिष तोट्टू (एक्सलन्स अचिव्हर्स) यांनी योगदान दिले. याप्रसंगी संघाचे प्रशिक्षक ऋषी पाटोळे, मयूर टेमक, प्रसाद पाटोळे, प्रणय रागिनवार, सिध्दार्थ चौहान, सौरभ चौहान, रोहन कुकरेजा, अक्षय बोऱ्हाडे आदी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सिध्दार्थ वांद्रे व ऋतिक चौहान यांनी परिश्रम घेतले. पंच म्हणून जोनाथन जोसेफ, सोनिया दोसानी, सलमान शेख, सुयोग महागडे, अभय साळवे यांनी काम पाहिले.

नाशिक येथे होणाऱ्या वेस्टर्न झोनल फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झालेल्या शहरातील खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे :– १७ वर्षा खालील मुले– नील देढवाल, वंश फिरोदिया, वीर छल्लाणी, पुष्कर डेरे, आतिश उरमुडे, साहील कुसळकर, १५ वर्षा खालील मुले– निरज धोका, निरज जगताप, स्वजीत खरात, आरुष पोपळघट, शुभंकर सावंत, वेदांत बनसोडे, अवधूत गायकवाड, १३ वर्षा खालील मुले –देवांश झरेकर, कृष्णा खांदवे, वेदांत बांगर.

# महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर गर्ल्स फूटबॉल स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवड चाचणीला प्रारंभ

## सीआरएस नोंदणी करुन सहभागी होण्याचे आवाहन

नगर – अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने मंगळवार (दि.२६ नोव्हेंबर) पासून महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर गर्ल्स स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवड चाचणीला प्रारंभ झाले आहे. या निवड चाचणीसाठी सीआरएस नोंदणी करुन जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस यांनी केले आहे.

८ ते १२ डिसेंबर २०२४ दरम्यान जळगाव येथे होणाऱ्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आयोजित ज्युनिअर गर्ल्स स्टेट चॅम्पियनशिप २०२४ साठी जिल्हा संघाची निवड चाचणी व सराव शिबिर अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेमार्फत होत आहे. १ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २०११ यादरम्यान जन्मतारीख असलेल्या खेळाडूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. सर्व सहभागी खेळाडूंना ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनचे नियमानुसार सीआरएस नोंदणी अनिवार्य करण्यात आहे. या निवड चाचणीमध्ये सहभागी होण्यासाठी खेळाडूंनी आधार कार्ड (सत्यप्रत) व जन्म दाखला (सत्यप्रत) आणि पासपोर्ट साईज फोटो ही कागदपत्रे सोबत घेऊन येणे आवश्यक असल्याचे म्हंटले आहे.

# विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच खेळ महत्त्वाचा : सुधीर चपळगांवकर

नगर – मेहेर इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांसाठी चांगल्या प्रकारे क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. ही कौतुकास्पद बाब आहे. ज्या विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळाले आहे त्यांचे अभिनंदन. क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची चांगली संधी आहे. शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खेळांमध्ये सहभागी व्हावे. शालेय जीवनात जे विद्यार्थी खेळात यशस्वी होतात. तेच राज्यात आणि देशात नावलौकिक मिळवितात. नगरचा खेळाडू पंकज शिरसाट यांनी कबड्डी या खेळात कर्णधार पद भुषविले असून छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार मिळवला आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळातही सहभागी होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन क्रीडा भारतीचे अध्यक्ष सुधीर चपळगांवकर यांनी केले आहे.



मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रसंगी क्रीडा भारतीचे अध्यक्ष सुधीर चपळगावकर. समवेत विजयी स्पर्धक, प्राचार्या अनुरीता झगडे आदी.

## मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

हिंद सेवा मंडळाचे मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण क्रीडा भारतीचे अध्यक्ष सुधीर चपळगांवकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य प्रा.अनुरीता झगडे, अभिजीत चेडे, गीता वलाकट्टी, उषा भालेराव, शितल दळवी, मोनिका बामदळे आदींसह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा.अनुरीता झगडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हावे.यासाठी शाळेचे चेअरमन जगदीश झालानी यांचे मार्गदर्शन लाभत असते. तसेच हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य मिळत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयमान बागवान यांनी केले. तर आभार समीना शेख यांनी मानले.

# रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत थात्तू, पत्रावाला, दानोले, परीट, सोनावने, तांबवेकर आणि जमादार यांना सुवर्णपदक

नगर – सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आणि अहमदनगर सायकलिंग क्लब यांच्या सहकार्याने सायकलिंग असोसिएशन ऑफ अहमदनगर डिस्ट्रीक्ट आयोजित ५व्या महाराष्ट्र राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडू सुर्या थात्तू (पुणे), मुस्तफा पत्रावाला (ठाणे), पूजा दानोले (कोल्हापूर), श्रावणी परीट (पुणे), मोक्ष सोनावने (नासीक), दानीश जमादार (नासीक), गायत्री तांबवेकर (पुणे) यांनी आपापल्या वयोगटात सुवर्णपदक विजेती कामगिरी केली.

अहिल्यानगर येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत १९९ सायकलपटूंनी सहभाग घेतला. चाँदबीबी महाल बायपास मार्गावर विविध ९ वयोगटात स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेचा उदघाटन समारंभ अहमदनगर सायकलिंग क्लबचे गौरव फिरोदीया यांच्या हस्ते पार पडला.

याप्रसंगी सायकलिंग फेडरेशन आफ इंडीयाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, स्पर्धेचे मुख्य पंच आणि सीएफआयचे निरीक्षक सुदाम रोकडे, मिहीर तिवारी, मुख्य तांत्रिक प्रमुख दिपाली पाटील, शिवछत्रपती पारितोषीक सन्मानीत मिनाक्षी शिंदे, मिनाक्षी ठाकूर आदी हजर होते.

स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे मेन ईलीट – ३८ किमी टायम ट्रायल सुवर्णपदक सुर्या थात्तू (पुणे ०.५०.२९.७९), रौप्यपदक – चिन्मय केवलरमाणी (पुणे ०.५०.३५.७०), कांस्यपदक – सिध्देश पाटील (कोल्हापूर ०.५३.००.५५), मेन अंडर २३ – ३८ किमी टाईम ट्रायल – सुर्णपदक मुस्तफा पत्रावाला (ठाणे ०.५२.५०.२६), विवाण सप्रू (मुबई ०.५३.२४.८९) कांस्यपदक – विरेंद्र सिंह पाटील (पुणे के पी ०.५३.३४.९८) ईलीट वुमेन – सुर्णपदक पूजा दानोले (कोल्हापूर ०.४७.१३.२०), रौप्यपदक – प्रणीता सोमण (अहिल्यानगर ४७.५६.०९), कांस्यपदक अपूर्वा गोरे (अहिल्यानगर ४९.५१.२३), सब ज्युनिअर बॉईज– १५ किमी टाईम ट्रायल सुवर्णपदक – मोक्ष सोनावने, (नासिक ०.२३.०८.१९), रौप्यपदक राज नारामण करमडे (अहिल्यानगर २३.३०.६१) कांस्यपदक – ओंकार गांधले (पुणे केपी –०.२३.४३.३८. सब ज्यनिअर गर्ल्स – १५ किमी टायम ट्रायल – सुवर्ण पदक – श्रावनी परीट (पुणे २६.०८.७४), रौप्यपदक – निम शुक्ला (मुंबई २६.४६.०२) कांस्यपदक मानसी महाजन (पुणे ०.२६.५२.५४) युथ बॉइज १० किमी टायम ट्रायल – सुवर्ण दानीश जमादार (सांगली ०.१७.११.३२) रौप्यपदक – संस्कार घोरपडे (पुणे ०.१७.१५.६९) कांस्य पदक अनुज गैड (पुणे ०१७.३९.८०) युथ गर्ल्स – १० किमी टायम ट्रायल सुवर्णपदक गायत्री तांबवेकर (पुणे ०.१९.१४.८६) रौप्यपदक – राजनंदीणी सोमवंशी (पुणे केपी ०.१९.५१.६३) कांस्यपदक अर्नवी सावंत (सातारा ०.२१.०४.६७)



सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आणि अहमदनगर सायकलिंग क्लब स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडू सूर्या थात्तू (पुणे), इतर सुवर्णप्राप्त खेळाडू. यांना पदके प्रदानप्रसंगी गौरव फिरोदिया आदी.



अहिल्यानगर रोलबॉल व एरोस्केटोबॉल स्पर्धा व संघ निवड चाचणी वाडियापार्क येथे झाले. उद्‌घाटन प्रसंगी संजय नन्नवरे व प्रदीप पाटोळे. समवेत संघटनेचे विविध पदाधिकारी.

# अहिल्यानगर रोलबॉल व एरोस्केटोबॉल स्पर्धा

नगर – सालाबादप्रमाणे २४ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर जिल्हा रोलबॉल स्पर्धा (वयोगट ११ वर्षे व १७ वर्षे मुले व मुली) तसेच अहिल्यानगर जिल्हा एरोस्केटोबॉल स्पर्धा वयोगट ११ वर्षे १४ वर्ष तसेच सीनिअर मुले व मुलींची जिल्हास्तर स्पर्धा व संघ निवड चाचणी जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथे झाल्या. या स्पर्धांसाठी जिल्ह्यातील विविध शाळंमधील तसेच प्रशिक्षण संस्थांमधून एकूण ११० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संघटनेचे कार्य अध्यक्ष संजय नन्नवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्‌घाटन समारंभ झाला. या वेळी संघटना अध्यक्ष प्रदीप पाटोळे यांनी खेळाडूंना संबोधित करत पालक, खेळाडू तसेच व्यासपीठावरील उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

यावेळी संघटना सचिव प्रशांत पाटोळे, प्रविण गायकवाड (टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन) कार्याध्यक्ष, विशाल साळवे रोल बॉल संघटना सदस्य, राजू पवार क्रीडा मार्गदर्शक, शैलेश गवळी जिल्हा ऑलिंपिक संघटना, अरुणोदय क्रिडा प्रतिष्ठानचे महेश आनंदकर सर, अविनाश काळे अध्यक्ष टेनिस बॉल क्रिकेट संघटना, गुलमोहर फुटबॉल क्लबचे प्रसाद पाटोळे, मयूर टेमरे, सचिन गायकवाड (टेनिस बॉल क्रिकेट संघटना) सचिव.

पंच म्हणून किरण माने, सचिन भापकर, अमोल ठोंबे, अक्षय चौधरी राष्ट्रीय थाय बॉक्सिंग राष्ट्रीय खेळाडू, कु.दर्शना कथेड, पीयूष कदम, कू. तनुज नन्नवरे, श्रीकांत कसाब, नवाज शेख यांनी काम पाहिले. यावेळी खेळाडूंना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

## मख़दुम सोसायटीतर्फे अजमत इक्बाल यांच्या

# अधुरी तखलिक या पौराणिक कथासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

नगर – जागतिक उर्दू दिवस डॉ अल्लामा इक्बाल जयंती दिनानिमित्त मखदूम एज्युकेशनल अँड वेलफेअर सोसायटीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय कौमी एकता सप्ताह मध्ये अजमत इक्बाल यांच्या अधुरी तखलिक (अपूर्ण निर्मिती) या कथासंग्रहाचे तांबोली हज टूर्सचे संचालक हाजी शौकतभाई तांबोली, आयटीआयचे प्राचार्य खालीद जहागिरदार, रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, प्रा.डॉ. महबूब सय्यद, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सुरुर, सल्लागार शरफुद्दीन शेख यांच्या हस्ते पुन: प्रकाशन करण्यात आले.



जागतिक उर्दू दिवस डॉ. अल्लामा इक्बाल जयंती दिनानिमित्त मखदूम एज्युकेशनल अँड वेलफेअर सोसायटीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय कौमी एकता सप्ताहमध्ये अजमत इक्बाल यांच्या अधुरी तखलिक (अपूर्ण निर्मिती) या कथासंग्रहाचे तांबोली हज टूर्सचे संचालक हाजी शौकतभाई तांबोली, आयटीआयचे प्राचार्य खालीद जहागिरदार, युनूसभाई तांबटकर, प्रा.डॉ. महबूब सय्यद, डॉ. कमर सुरुर, शरफुद्दीन शेख यांच्या हस्ते पुन: प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी मालेगावचे शायर डॉ.नईम अख्तर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद खलील, सचिव निसार बागवान, तन्वीर चष्मावाला, डॉ. शमा फारुकी, राजुभाई शेख, शफकत सय्यद, आरिफ सय्यद, सहेली ग्रुपच्या नर्गीस इनामदार आदी उपस्थित होते. रेहमत सुलतान हॉलमध्ये झालेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मालेगावहून आलेले कवी डॉ.नईम अख्तर होते.

शहर आणि राज्याबाहेरील कवींनी श्रोत्यांसमोर आपली शायरी सादर करून दाद आणि वाह वाही मिळवली. डॉ. कमर सुरुर यांनी लेखक अजमत इक्बाल यांचा सविस्तर परिचय करून दिला. अहमदनगर शहरात प्रथमच उर्दू कथासंग्रहचे प्रकाशन होत असल्याचे स्पष्ट केले. अहमदनगर शहरातील साहित्य वर्तुळ आणि श्रोत्यांसाठी भाग्याची गोष्ट आहे की या शहरातून या संग्रहाची पहिली आवृत्ती शेजारच्या देशात प्रेस फॉर पीस पब्लिकेशनने प्रकाशित केली होती.

पुस्तकाचे लेखक अजमत इक्बाल यांनी आपली कहाणी अनोख्या पद्धतीने रसिकांसमोर मांडली. सभागृहात प्रेक्षक उपस्थित होते. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. अजमत इक्बाल यांनी सादर केलेली कथा श्रोत्यांनी केवळ उत्साहाने ऐकली नाही तर कथेबद्दल कौतुकही व्यक्त केले. अजमत इकबाल यांनी मान्य केलेल्या किमतीत पौराणिक संग्रह मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आला. अजमत इकबाल यांनी मखदूम एज्युकेशनल सोसायटी आणि विशेषत: आबिद खान आणि कमर सुरूर यांचे आभार मानले.

कविते सारख्या शैलीतील उर्दू साहित्याच्या पुनर्प्राप्तीसाठी कल्पित लेखनाच्या कलेकडे लक्ष देणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन त्यांनी केले. अहमदनगर शहरातील अत्याधुनिक वाचक काल्पनिक कथांना आपल्या अभ्यासाचा भाग बनवतील अशी आशा व्यक्त केली. मालेगाव शहरातील चित्रकार अली इम्रान यांनी या कार्यक्रमात केवळ सहभाग घेतला नाही तर स्वत:च्या हाताने तयार केलेले कमर सुरूर यांचे चित्रही सादर केले. अली इम्रानच्या पेंटिंगला स्टेजवरील पाहुणे आणि प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. सोहळ्याच्या दुसऱ्या भागात निमंत्रित कवींनी आपली शायरी सादर केली.

डॉ.नईम अख्तर यांनी अजमत इक्बाल यांच्या कथालेखनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला आणि शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यक्रमात प्रेक्षक रात्री उशिरापर्यंत आपापल्या जागेवर खिळून राहिले.

फंडू एसएमएस

सुबह होती नही, शाम ढलती नहीं, न जाने क्या खूबी है आप में की आप को याद किए बिना खुशी मिलती नहीं।

हमने भी कभी प्यार किया था। थोडा नहीं बेशुमार किया था। दिल टूट कर रह गया, जब उसने कहा, अरे मैंने तो मजाक किया था।

उस से मांगा था फकत वक्त मैंने, वो नादां दे गया एक घडी मुझको तोहफे में।

# डेटिंग करू का?

मॅच मेकिंग



मी बँकिंग क्षेत्रात काम करणारी २६ वर्षांची तरुणी असून आजवर कोणाला डेट केलेलं नाही. खरं सांगायचं तर शाळा-कॉलेजमध्ये मी खूप अभ्यासू मुलगी होते. सतत अभ्यासात लक्ष असायचं. त्यामुळे या गोष्टींकडे कधी लक्षच दिलं नाही. पण आता आईवडील माझ्यासाठी स्थळं शोधू लागले आहेत तर दुसरीकडे मित्रमैत्रिणी मला डेटिंग करायला सांगत आहेत. त्यांच्या मते डेटिंगमधून निर्माण होणारं मैत्रीचं नातं आपल्याला खूप काही शिकवून जातं आणि त्यामुळे जोडीदाराची निवड करताना अडचणी येत नाहीत. या सगळ्यात माझा वैचारिक गोंधळ होत आहे. अशा परिस्थितीत काय करू? आईवडिलांना वर्षभरात माझं लग्न करायचं आहे. असं असताना एखाद्या मुलाला डेट केलं तर त्याच्या आणि माझ्या भावनांशी खेळण्यासारखं होईल. मित्रमंडळींचं म्हणणंही मला पटतंय. पण डेटिंगची वेळ निघून गेली आहे का? मी काय करू ?

**उत्तर** : डेटिंग सध्याच्या लग्नाळू मुलामुलींच्या आयुष्यातला अविभाज्य भाग आहे. यातून आपल्याला नात्यांबाबतचे असंख्य अनुभव मिळतात. पण हे अनुभव मिळवण्याचा डेटिंग हा एकमेव मार्ग नाही. भटकंती, मैत्रीपूर्ण संबंध, उत्तम संवाद यातूनही आपण स्वत:बद्दल आणि परस्परांमधील नात्यांबद्दल बरंच काही जाणून घेऊ शकतो. यातूनही हळवे ऋणानुबंध निर्माण होऊ शकतात. डेटिंग करायचं म्हणून करण्यात काहीच अर्थ नाही. कारण तू आजवरच्या आयुष्यात बरेच अनुभव घेतले असतील. पुढच्या काळात तुझ्या आयुष्यात भावभावनांचा, विचारांचा कल्लोळ उठणार आहे. यासाठी तू पुरेसा वेळ द्यायला हवा. लग्नाच्या विचाराने तू खूप अस्वस्थ झाली आहेस. योग्य जोडीदाराची निवड करण्याचा ताण तुझ्यावर आहे. ही अस्वस्थता डेटिंगच्या माध्यमातून तुला दूर करायची आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तू कोण आहेस आणि तुला काय हवं आहे याबाबतच्या विचारांमध्ये स्पष्टता आण. त्यानंतरच तू योग्य विचार करु शकशील. हवा तसा जोडीदार शोधू शकशील. नातेसंबंध फुलण्यासाठी वेळ लागतोच. तू ही तो द्यायला हवा.

# जोश

एखादा सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुण शेतीकडे वळू शकतो का? कंपन्यांमधून मोठ्ठाली पॅकेज मिळवणारी ही मंडळी शेतीकडे वळणं तितकसं शक्य नाही असंच आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत. इतकंच नाही तर कंपनीकडून मिळणाऱ्या पॅकेजपेक्षाही जास्त उत्पन्न ते मिळवत आहेत. अनुप पाटील हा असाच एक तरुण...

# आयटी सोडून शेतीमध्ये!

अचिव्हर

अनुप पाटील हा २८ वर्षांचा तरुण... तो सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. पण आता त्याने शेतकरी म्हणून नाव कमावलं आहे. शेतीतून काही उत्पन्न मिळत नाही, शेती करणं म्हणजे गरिबी कवटाळणं, शेतीत काय करिअर होणार असं अनेकांना वाटत असतं. पण अनुपने हा विचार पूर्णपणे बदलला आहे. काही वर्षांपूर्वी आयटी कंपनीत काम करणारा अनुप आज शेतात राबतो आहे. आयटी क्षेत्रात काम करत असूनही अनुपला समाधान मिळत नव्हतं. तो आठवड्यातले सहा दिवस काम करायचा. पगार उत्तम होता. पण यात काही दम नाही अशी त्याची भावना होती. मग एके दिवशी त्याने राजीनामा द्यायचं ठरवलं. राजीनामा पत्र तयार केलं आणि कंपनीला पाठवून दिलं. नोकरी सोडली आणि पुण्यातल्या फ्लॅटवर आला. आपण बेरोजगार झाल्याचं त्याने कोणालाही सांगितलं नाही. नोकरी सोडल्यानंतर पुढचे तीन महिने त्याच्याकडे उत्पन्नाचं कोणतंही साधन नव्हतं.

या काळात तो शांतही बसला नाही. या दरम्यान तो गुजरात, कर्नाटक आणि महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना भेटत होता. यातून त्याने शेतीबद्दल सगळी माहिती गोळा केली. ऑनलाईन सर्च केला. पूर्वतयारी केल्यानंतर तो सांगलीतल्या नागरले या आपल्या गावी आला. आता त्याच्याकडे शेतीची सगळी योजना तयार होती. अनुपला नोकरदार म्हणून राहायचं नव्हतं. कोणाचा तरी नोकर म्हणून काम करताना तुमची प्रगती होऊ शकत नाही यावर त्याचा ठाम विश्वास होता. आयुष्यभर त्याला चाकरी करायची नव्हती. स्वत:चा व्यवसाय करायचं स्वप्न अनुपने पाहिलं होतं. आज त्याचं हे स्वप्न पूर्ण झालं. अनुपच्या १२ एकर शेतात १२ कामगार राबतात. अनुप आपल्या शेतात लाल, पिवळ्या रंगाच्या ढोब ळी मिरच्या, मका, ऊ स आणि झेंडूच्या फु लांचं उत्पादन घेतो. गेल्या वर्षीची त्याची उलाढाल २० ते २५ लाख रुपये इतकी होती. यंदा त्यात वाढ होणार असल्याचं त्याचं म्हणणं आहे. इंजिनिअर म्हणून त्याला वर्षाला ६.५ लाख रुपये मिळायचे. एवढं त्याचं पॅकेज होतं. आता शेतकरी म्हणून तो जवळपास तिप्पट कमाई करतो आहे. मेहनत आणि जिद्द असेल तर माणूस काहीही करू शकतो हे अनुपने सिद्ध केलं आहे. गरज आहे ती वेगळी वाट धरण्याची, अंगी जिद्द बाळगण्याची.



# संकल्प पूर्णत्त्वास न्यायचा तर...

फिटनेस फंडा

दोस्तांनो, थोड्याच दिवसांमध्ये नव्या वर्षाचं काउंटडाउन सुरू होईल. हा, हा म्हणता दिवस जातील आणि नववर्षाची पहाट उजाडेल. नव्या वर्षात संकल्पांचा पाऊ स पडतो. मी हे करेन, मी असं वागेन, तसं जगेन असे बरेच बेत आखले जातात. पहिले १० ते १५ दिवस ते अंमलातही येतात. पण नंतर पहिले पाढे पंचावन्न! बदलत काहीच नाही. पण यंदा असा गलथानपणा करु नका. नववर्षांच्या संकल्पांमध्ये फिटनेसला पहिला क्रमांक द्यायला हवा. अनेक जण आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करण्याचा संकल्प करतात. पण हा संकल्प तडीस जात नाही. त्यामुळे यंदा अशा संकल्पांच्या फंदात पडू नका. फिटनेस हा एक प्रवास आहे जो सातत्यपूर्ण पद्धतीने करायला हवा. काही महिने किंवा वर्षभर प्रयत्न करून काहीच होत नाही. फिटनेसचा फंडा अंगवळणी पडायला हवा. तंदुरुस्तीचं उद्दिष्टं नव्या वर्षापुरतं नाही तर आयुष्यभरासाठी असायला हवं. यासाठी काय करता येईल? पाहू या.

✻ कोणताही बदल एकदम होत नाही. प्रारंभ उत्साहाने झाला तरी त्याचा शेवट मरगळलेलाच असतो. आयुष्याला अचानक शिस्त लागत नाही. त्यामुळे एक एक पाऊल पुढे टाका. जंक फूड, अनारोग्यदायी पदार्थ पूर्णपणे बंद करण्यापेक्षा त्यांचं प्रमाण कमी करा. सुरूवातीला जीवनशैलीत छोटे छोटे बदल करा. त्यांची सवय करून घ्या. मगच पुढे जा.

✻ आधी व्यायाम आणि आहार यावर लक्ष केंद्रित करा. आपण किती खाल्लं, कोणता व्यायाम केला याची नोंद करत राहिल्याने तुम्ही जबाबदार व्हाल. वजन कमी करण्यासाठी नेमकं काय करायला हवं याचा अंदाज येईल.

✻ संकल्प तर केला पण तो तडीस नेण्यासाठी काय करायचं हे माहीत नाही किंवा पुरेसं ज्ञान नाही. मग काय करायचं? माहिती मिळवायची, तज्ज्ञांची मदत घ्यायची. फिटनेसवरचे लेख, पुस्तकं वाचायची. आपल्याला त्यातलं काय जमतं हे बघायचं.

✻ प्रेरणादायी व्हिडिओ बघून किंवा गाणी ऐकून काही होणार नाही. तुमच्या मनात फिटनेस राखण्याची इच्छा जागृत व्हायला हवी. तरच तुम्ही फिटनेसचं ध्येय गाठू शकाल.

✻ कुठेतरी काहीतरी वाचलं म्हणून ते लगेच अंमलात आणू नका. जमणाऱ्या गोष्टी करा. वेगवेगळी डाएट फॅड्स आहेत. त्यांच्या मागे लागू नका. सरळ, साधे, सोपे फंडे अंगिकारा.



# हेल्दी ओटमील बाऊल

इन्स्टंट कुकिंग




दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने तुम्ही होस्टेलवर राहता. अनेकदा पीजी म्हणूनही राहावं लागतं. अशा वेळी खाण्यापिण्याचे हाल होतात. मेस लावली तरी घाईगडबडीच्या वेळी किंवा चवीत बदल म्हणून स्वत:च्या हातांनी काहीतरी करून खावं असं वाटतं. घरात फारसे पदार्थ नसतात किंवा फापटपसारा फार वाढवायचा नसतो. अशा वेळी काय करायचं हा प्रश्न पडतो. म्हणूनच तुमच्यासाठी काही हटके रेसिपी आणल्या आहेत. साध्या, सरळ आणि झटपट होणाऱ्या या रेसिपी तुम्ही नक्की करून बघा.

न्याहारीसाठी चविष्ट पण हेल्दी काही हवं असेल तर ओटमील बाऊलचा पर्याय आहे. यासाठी एक कप ओट्स, एक कप पाणी, दालचिनीचा छोटा तुकडा, चवीनुसार मीठ, एक कप दूध, उपलब्ध फळं, अक्रोड, दोन चमचे बटर असं साहित्य घ्या. एका भांड्यात ओट्स, पाणी, दूध, मीठ आणि दालचिनी घाला. हे भांडं मंद आचेवर गॅसवर ठेवा. सतत हलवत राहा. मिश्रण घट्ट झालं की गॅस बंद करा. फळं, अक्रोड, बटर हे पदार्थ त्यात घाला. हलवून घ्या. गरम गरम खा. न्याहारीला तेच ते पदार्थ खाऊन कंटाळा आला असेल किंवा खूप घाई असेल तर तुम्ही ओट्सचा हा हेल्दी ब्रेकफास्ट करू शकता.

# लवकर निवृत्त होण्यासाठी...

सेव्हिंग मंत्रा

शिक्षण, करीअर, नोकरीच्या धावपळीत आवडीच्या गोष्टी करायला वेळ मिळत नाही. हे नंतर करू, ते कधीही करता येईल असं म्हणता म्हणता दिवस कसे निघून जातात कळतच नाही. करीअर नाही करायचं तर करायचं तरी काय? हा प्रश्न कोणी विचारू शकतो. पण दोस्तांनो, करीअर तर करायचं पण सोबत बचतही करायची. लवकर निवृत्त व्हायचं आणि आवडीच्या गोष्टींना वेळ द्यायचा. आता हे कसं बरं साधणार? म्युच्युअल फंडांबद्दल तुम्ही ऐकलंच असेल. या फंडांच्या सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लान म्हणजे सिप योजनांमध्ये गुंतवणूक करून लवकर निवृत्त होता येतं. समजा आता तुम्ही २५ वर्षांचे आहात आणि १५ वर्षांनी निवृत्त व्हायचं आहे तर सिपमधल्या गुंतवणुकीला सुरुवात करा. आता हे गणित जुळवायचं तर चाळिशीपर्यंत तुमच्याकडे एक कोटी रूपयांचा निधी



असायला हवा. त्यानंतर हे पैसे गुंतवून महिन्याला पुरेसं उत्पन्न मिळवता येतं. म्हणजे तुम्ही कामाचा ताण बराच कमी करू शकता.




त्यासाठी सिप योजनेत दरमहा दहा हजार रूपये गुंतवायला सुरूवात करा. त्यानंतर प्रत्येक वर्षी त्यात दोन हजार रूपयांची भर घाला. या गुंतवणुकीवर १२ टक्के दराने परतावा मिळाला तर १५ वर्षांनी तुमच्याकडे ९५ लाख म्हणजे जवळपास एक कोटी रूपये असतील. हा पैसा सिस्टमॅटिक विड्रॉवल प्लानमध्ये गुंतवता येईल. या योजनेत ९ टक्के व्याजाने महिन्याला ठराविक रक्कम मिळते. म्हणजे महिन्याला ८० ते ८५ हजार रूपयांचं उत्पन्न घरबसल्या मिळतं.

सिस्टमॅटिक विड्रॉवल प्लान म्हणजे एसडब्ल्यूपी. यात एकहाती पैसा गुंतवून महिन्याला ठराविक रक्कम मिळवता येते. तुम्हाला लवकर निवृत्त होऊन आवडीनिवडी जपायच्या असतील तर नोकरीला लागल्यावर लगेचच बचतीला प्राधान्य द्या. सिप आणि एसडब्ल्यूपी या योजनांची माहिती घ्या आणि टेंशन फ्री आयुष्य जगा.



# बहुढंगी डेनिम शर्ट

फॅशन पॅशन

आपल्या सर्वांचं ऑल टाईम फेवरिट म्हणजे डेनिम फॅब्रिक. एखादी-दुसरी जीन्स आणि तीन-चार टी शर्ट बॅगेत भरले की आपल्याला कशाची गरज भासत नाही. तसंच एखादा डेनिम शर्ट आपला लूक पूर्णपणे बदलू शकतो. डेनिमचा हा शर्ट तुम्ही वेगवेगळ्या बॉटम्ससोबत कॅरी करू शकता. स्टायलिश दिसण्यासोबत रूबाबही टिकवून ठेवायचा असेल तर डेनिम शर्टला पर्याय नाही. हा शर्ट कसा कॅरी करायचा? पाहू या.

✻ चिनोजसोबत डेनिम शर्ट कॅरी करा. नेहमीचा पांढरा शर्ट बाजूलाच ठेवा. टी शर्टवर जॅकेटप्रमाणेही हा शर्ट घालता येईल. सोबतीला व्हाईट स्निकर्स आहेतच. कॅज्युअल मीटिंग्ज, संध्याकाळच्या कॅज्युअल पार्ट्या तसंच डिनरला जाताना तुम्ही हा लूक कॅरी करू शकता. ✻ भटकंतीला गेल्यावर शॉर्टसवर डेनिम शर्ट घाला. न्यूट्रल रंगांमधल्या शॉर्टस घ्या. डेनिम शर्ट आणि क्लासी टॅन ब्राउन लोफर्सनी लूक खुलवा. ✻ गडद निळ्या जीन्सवर लाईट ब्लू डेनिम शर्ट घाला. वीकेंड पार्टी तसंच डिनरला हा लूक मस्त दिसेल. ✻ पांढरा टी शर्ट, त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हादेखील भन्नाट पर्याय आहे. ही स्टाईल कधीच दगा देणार नाही. तुम्ही यात उठून दिसणारच. कॉलेजमध्ये, मॉलमध्ये जाताना किंवा बर्थ डे पार्टीला हा लूक कॅरी करता येईल. ✻ ऑफिसमध्ये डेनिम कॅज्युअल लूक देतं असं वाटतं का? तर मग तुम्हीच नवा ट्रेंड आणा. फॉर्मल ब्लॅक पँटवर डेनिम शर्ट घाला. एखादेवेळी नियम मोडायला काहीच हरकत नाही. ✻ डेनिम शर्टवर टाय... वाचून धक्का बसला ना? दोस्तांनो, फॅशन विश्व बदलतंय. या बदलत्या जगाचा भाग व्हायचं असेल तर थोडे प्रयोगशील व्हा. मिक्स ॲण्ड मॅचचा फॉर्म्युला वापरून फॉर्मल पँटवर डेनिम शर्ट, टाय आणि कोट घालता येईल. फॉर्मल मीटिंग तसंच कोणत्याही फॉर्मल ऑकेजनला हा लूक चालून जाईल.

# लेखनामध्ये गती आहे?

वेगळ्या

लेखन क्षेत्राचं रुपडं बदलत आहे. डिजिटल माध्यमांचा वाढता वापर, वाचनाच्या बदललेल्या आवडीनिवडी यामुळे लेखन आणि वाचनाशी संबंधित नवे ट्रेंड येत आहेत. या नव्या ट्रेंडचा भाग बनायचं असेल तर बदलांचा स्वीकार करायलाच हवा. मागे राहून चालणार नाही. स्व प्रकाशन म्हणजे सेल्फ पब्लिशिंग हा याच ट्रेंडचा एक भाग आहे. तुम्हाला लेखनाच्या क्षेत्रात गती असेल किंवा भविष्यात लेखक होण्याची स्वप्नं बघत असाल तर सेल्फ पब्लिशिंगचा विचार करायला हवा. नवे, होतकरू युवा लेखक सध्या या पर्यायाचा गांभीर्याने विचार करत आहेत. तुमचं पुस्तक लिहून तयार असेल तर त्यासाठी प्रकाशकांच्या पायऱ्या झीजवण्याची गरज आता उरलेली नाही. लेखक म्हणून नाव कमवायचं असेल आणि सेल्फ पब्लिशिंगचा मार्ग धुंडाळायचा असेल तर काय करायला हवं याविषयी...

✻ लिखाणाचा सराव करत रहा. सरावामुळे तुमची कौशल्यं विकसित होतात. या छंदाचं व्यवसायात रूपांतर करायचं असेल तर सतत लिहायला हवं. या क्षेत्रात बरीच स्पर्धा आहे. बराच संघर्षही करावा लागतो. त्याची तयारी हवी.

✻ ऑनलाईन अस्तित्व दाखवायला सुरूवात करा. वेबसाईटच्या माध्यमातून लेखन लोकांपर्यंत पोहोचवता येईल. विक्ससारखी अनेक माध्यमं स्वत:ची वेबसाईट तयार करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतात. त्यांचा वापर करा.

✻ किंडल डायरेक्ट पब्लिशिंगसारखे अनेक ऑनलाईन पर्याय आहेत. त्यांचा वापर करून ई बुक प्रकाशित करता येईल. इतकंच नाही तर मार्केटिंगसोबतच लेखकांना ७० टक्के रॉयल्टीही दिली जाते.

✻ लूलू, नोशन प्रेस, ब्लू रोज प्रिंट यासारखे पर्याय तुमच्याकडे आहेत. पुस्तकांचं मार्केटिंग करण्याचं तंत्रही तुम्ही इथे शिकू शकता.




स्मार्ट टिप्स


## गेम्स खेळा, शब्दसंपत्ती वाढवा




कोणत्याची भाषेत निपुण व्हायचं असेल तर तुमची शब्दसंपत्ती उत्तम असावी लागते. शब्दसंपत्ती असेल तरच तुम्ही एखाद्या भाषेत उत्तम संवाद साधू शकता. त्यातही इंग्रजीत संवाद साधायचा असेल तर शब्द माहीत असायला हवेत. इंग्रजीची शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी तुम्ही काही गेम्स खेळू शकता. यासोबतच परदेशी भाषांमध्ये संवाद साधण्यासाठीही हे गेम्स उपयुक्त ठरतील. 'स्क्रॅबल' या गेममध्ये इटालियन, फ्रेंच, पोर्तुगिज, जर्मन या भाषांमधले शब्द देण्यात आले आहेत. 'वर्ड कनेक्ट', 'वर्ड क्रॉस' आणि 'पॉवर वर्ड' हे गेम्सही उपयुक्त ठरू शकतात.

मस्ट हॅव्ज

## विकिपीडिया वापरताय?




विकिपीडिया हा माहितीचा खजिना आहे. बरेचजण माहिती मिळवण्यासाठी विकिपीडियाचा वापर करतात. विकीपीडिया अधिक प्रभावीपणे वापरण्यासाठी काही टूल्स उपयोगी पडू शकतात. ट्विटरवर विकी गुड आर्टिकल्स नावाचं टूल आहे. विकिपीडियाने युजर्ससाठी चांगल्या आर्टिकल्सची यादी केली आहे. हे लेख इथे मिळू शकतील. गूगल मॅप्स आणि विकिपीडिया यांच्या एकत्रिकरणातून कोपरनिकस हे टूल तयार झालं आहे. या टूलमुळे वर्ल्ड मॅप्सची माहिती मिळू शकते. वीकलीपीडियामध्ये विकिपीडियातले बदल करण्यात आलेले लेख पहायला मिळतात तर विकिटविक्स हे गूगल एक्स्टेंशन टूल आहे.

लक्षात ठेवा

## बनावट ॲप्सपासून सावध रहा...



ॲंड्रॉइड फोनला बनावट ॲप्सचा खूप धोका असतो. गूगल प्ले स्टोअरमध्ये प्ले प्रोटेक्स हे फीचर आहे. म्हणूनच गूगलने जवळपास १९० बनावट ॲप्स ब्लॉक करून टाकली होती. पण अशी ॲप्स इतर मार्गाने तुमच्या फोनमध्ये डाउनलोड होतात. नॉन गूगल ॲप स्टोअरमधून अशी ॲप्स डाउनलोड होतात. म्हणूनच आपण काळजी घ्यायला हवी. याच कारणामुळे कोणतंही ॲप गूगल प्ले स्टोअरमधून डाउनलोड करून घ्या. असुरक्षित वेबसाईट ओपन करू नका. या साईटवरून कोणतंही ॲप डाउनलोड करू नका.

बी अलर्ट

## गूगल मॅप्स देईल इशारा

सध्या गूगल मॅप्समुळे बऱ्याच गोष्टी सुलभ झाल्या आहेत. या मॅपमुळे रस्ते शोधताना फार त्रास होत नाही. त्यातच अनोळखी ठिकाणी प्रवास करताना या मॅपचा खूप उपयोग होतो. महिला, मुली कॅबने प्रवास करतात. अशा वेळी आपण योग्य मार्गाने जात आहोत किंवा नाही हे जाणून घेणं खूप गरजेचं असतं. या कामी गूगल मॅप तुमची मदत करू शकतो. या मॅपवरच्या एका फीचरमुळे कॅब चुकीच्या मार्गाने जाऊ लागली की तुम्हाला सूचना दिली जाईल. हे फीचर सुरू करण्यासाठी गूगल मॅपमध्ये जाऊन तुमच्या गंतव्य स्थानाची नोंद करावी लागेल. यानंतर डायरेक्शन बटन या ऑप्शनची निवड करावी लागेल. ड्रायव्हिंग आयकॉनवर क्लिक केल्यानंतर इथे स्टे सेफर हा ऑप्शन दिसेल. मग 'गेट ऑफ रूट'चा पर्याय मिळेल. यानंतर तुम्हाला चुकीच्या मार्गाची सूचना मिळेल.

# शहरातील नागरिकांचे प्रश्न जलद गतीने मार्गी लागण्यासाठी ‘कमिटी’ नेमणार

### संपत बारस्कर यांचे प्रतिपादन; कादंबरीनगर मोकाशे वस्ती व बिरोबा मंदिर परिसरातील ड्रेनेज लाईन, रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून कादंबरीनगर मोकाशे वस्ती व बिरोबा मंदिर परिसरातील ड्रेनेज लाईन रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन झाले. याप्रसंगी उपस्थित असलेले नागरिक आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – प्रभागाचा नियोजनबद्ध विकास आराखडा तयार केला असून त्यानुसार प्रभागांमध्ये विकासाची कामे सुरू असल्यामुळेच आ. संग्राम जगताप यांना प्रभागांमधून मोठे मताधिक्य मिळाले आहे, नगरकरांनी देखील विकास कामावर विश्वास ठेवला असून मतरुपी आशीर्वाद दिले आहे, जमिनी अंतर्गतील विकासाची कामे मार्गी लावली असल्यामुळे कायमस्वरूपीची मार्गी लागत आहे आता ती कामे पुन्हा पुन्हा करण्याची वेळ आपल्यावर येणार नाही व्हीजन ठेवून स्वच्छ, सुंदर, हरित प्रभागाची निर्मिती करीत आहे, नागरिकांचे जलद गतीने प्रश्न मार्गी लागावे यासाठी प्रभागातील नागरिकांचीच विविध विषयासंदर्भात कमिटी केली जाईल, त्यानुसार विकास कामांना प्राधान्यक्रम दिला जाईल, प्रभागाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी आम्ही सर्व माजी नगरसेवक काम करत आहे, आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून प्रभागाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध झाला असल्यामुळे रस्त्याचे जाळे निर्माण होत असून नागरिकांच्या पायाला चिखल लागणार नाही, तलाठी कार्यालयासमोरील डीपी रस्त्याचे काम हाती घेतले असून लवकरच ते पूर्ण होईल, असे प्रतिपादन संपत बारस्कर यांनी केले,

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून कादंबरीनगर मोकाशे वस्ती व बिरोबा मंदिर परिसरातील ड्रेनेज लाईन रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन झाले.

यावेळी डॉ. सागर बोरुडे, मीना चव्हाण, संदीप रोडे, योगेश ठुबे, जय दंडवते, बाळासाहेब गिरंगे, दिलीप भोसले, गौरव हारदे, योगेश मोकाशे, वैभव बारटक्के, बाबासाहेब कदम, हिरामण मोरे, वैशाली कर्डिले, सोनाली कराळे, स्वप्नाली लाटकर, संजय चितळकर, संजय सोनवणे, अनिल राऊत, किरण उंडे, आशिष दळवी आदी उपस्थित होते

डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, प्रभाग क्रमांक एकचा विकास कामातून कायापालट होत असून, नावाप्रमाणेच शहरामध्ये एक नंबर करायचा आहे प्रभागातील नागरिक विधानसभा निवडणुकीमध्ये विकास कामांबरोबर राहिले आहेत. प्रभागातील नागरिक विकासकामे केल्यामुळे समाधान व्यक्त करत आहे असे ते म्हणाले.



नेप्ती येथील आनंदऋषीजी अपंग कल्याण केंद्र व निवासी अपंग विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांनास्नेहबंध फौंडेशनच्या वतीने सतरंजी भेट देताना डॉ. उद्धव शिंदे. समवेत काकासाहेब बारवकर, निशांत पानसरे.

## ‘स्नेहबंध’तर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना सतरंजी भेट

नगर – स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने नेप्ती येथे आनंदऋषीजी अपंग कल्याण केंद्र व निवासी अपंग विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सतरंजी भेट दिली. याप्रसंगी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, व्यवस्थापक काकासाहेब बारवकर, निशांत पानसरे आदी उपस्थित होते.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, आनंदऋषीजी अपंग कल्याण केंद्र व निवासी अपंग विद्यालयात गोर गरीबांची मुले शिक्षण घेत आहे. तर अंगी गुण असूनही केवळ आर्थिक परिस्थिती अभावी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे दुरापास्त होते. आता थंडी मोठ्या प्रमाणात जाणवू लागली आहे. थंडीपासून बचाव व्हावा यासाठी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सतरंजी भेट देण्यात आली.

स्नेहबंध फाउंडेशनच्या वतीने आजवर बेघर, निराधार, कामगार, अनाथ गरजूंना छत्री, टोपी, कपड्यांचे वाटप, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, रक्तदान शिबिर, अंध अपंगांना मदत, अनाथ आश्रमात जाऊन वाढदिवस साजरे करणे असे अनेक उपक्रम राबवले आहेत.

### स्वत:वर विश्वास ठेवून मनाची तयारी करा यश मिळेल

विविध प्रकारच्या परिक्षेत यश संपादन करायचे असेल तर आत्मविश्वास, जिद्द आणि कठोर मेहनत करणे आवश्यक आहे स्वत:वर विश्वास ठेवून मनाची तयारी केली तर निश्चित यश प्राप्त होईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार व वारसा पुढे चालवत शिक्षणामुळे आपण यशाचे शिखर गाठु शकतो. आई वडील यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कष्ट करा, असे आवाहन डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

## अवैधरित्या गुटखा वाहतूक करणाऱ्यास पकडले

### ७ लाखांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



संगमनेर शहरानजीक अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करणाऱ्यास पकडल्या नंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – कोल्हार–घोटी राज्यमार्गावर संगमनेर शहरानजीक अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करणार्यास गुटखा आणि वाहन असा मिळून एकूण ६ लाख ९३ हजार ६०० रुपयांच्या मुद्देमालासह पकडले आहे. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी (दि. २५) दुपारी बारा वाजेच्या सुमारास केली आहे.

गुटखा बंदी असतानाही त्याची वाहतूक होत असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळाली होती. त्यावरुन त्यांनी पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. तपास पथकातील पोलीस अंमलदार संतोष लोढे, सोमनाथ झांबरे, रणजीत जाधव, विशाल तनपुरे व बाळासाहेब गुंजाळ यांनी संगमनेर शहरानजीक कोल्हार–घोटी राज्यमार्गावर सुनील रमेश नाईकवाडे (रा. धामणगाव पाट, ता. अकोले) हा कारमधून (क्र. एमएच.०१, डीई ७९६६) गुटखा घेऊन जात असताना पकडला. त्याच्याकडे चौकशी केली असता हा गुटखा कोल्हापूर येथील गोपाल (पूर्ण नाव माहीत नाही, फरार) याच्याकडून विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे सांगितले.

या कारवाईत पोलिसांनी १ लाख ७४ हजार २४० रुपयांचा गुटखा, १९ हजार ३६० रुपयांची सुगंधी तंबाखू व ५ लाख रुपयांची कार असा एकूण ६ लाख ९३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोकॉ. बाळासाहेब गुंजाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांनी वरील दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## मासिक पाळी विकारग्रस्ताना योगाभ्यास उपयुक्त

**डॉ. मुग्धा साताळकर तन्वर**



स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मुग्धा साताळकर तन्वर यांचा सत्कार करतांना सौ.मीना देशपांडे. समवेत शेखर एडके व उपस्थित योगाभ्यासक.

नगर – अनियमित मासिक पाळीमुळे महिलांच्या हार्मोन्समध्ये बदल होतात. या समस्येकडे फार दूर्लक्ष केल्यास स्त्रीयांमध्ये गर्भधारणा होण्यास अडचणी, थायरॉड व गर्भाशयाचा कॅन्सर होणे अशा समस्या निर्माण होतात. या समस्यावर योगाभ्यासाचा फार चांगला उपयोग होतो असे स्त्रीरोगतज्ञ डॉ. मुग्धा साताळकर तन्वर यांनी सांगितले.

महिलांचे मासिक धर्म शंका समाधान या विषयावर डॉ. मुग्धा साताळकर तन्वर यांचे व्याख्यान येथील योग विद्या धामच्या 'योग भवन' येथे झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

डॉ. साताळकर तन्वर पुढे म्हणाल्या की, बाहेरचे जंक फूड, फास्ट फुड वरचेवर खाणे तसेच कीटकनाशकांची फवारणी केलेले व मोठया प्रमाणावर रासायनिक खते घालून पिकविलेले अन्नधान्य, फळे व भाज्या खाल्लयामुळे या समस्या निर्माण होतात. या समस्या निर्माण होऊ नये म्हणून महिलांनी पुरेशी ८ तास झोप घेणे, सकस आहार घेणे आणि व्यायाम करणे, पाणी भरपूर पिणे आवश्यक आहे. तसेच सूर्यनमस्कार घालणे, ध्यानाचा अभ्यास करणे अशा प्रकारचा योगाभ्यास केल्यास या समस्या दूर होतात व अशा प्रकारच्या समस्या निर्माण होत नाहीत.

यावेळी व्याख्यात्यांचा परिचय शेखर एडके यांनी करून दिला तर त्यांचा सत्कार सौ. मिना देशपांडे यांनी केला.

योग शिक्षक वैशाली पिसाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## संविधानामुळे प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार मिळाला

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत घेतली शपथ



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना आ. संग्राम जगताप आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – भारत देशाच्या भूमीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेमुळे प्रत्येक व्यक्तीला समानतेचा हक्क मिळाला आहे. आज या राज्यघटनेला ७५ वर्ष पूर्ण झाले, त्या राज्यघटनेनुसार आपण समाजामध्ये काम करत आहोत. संविधानाबाबत जनजगृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. संविधानामुळे एकतेचा संदेश दिला जात असून सर्व जाती धर्मातील लोक गुण्यागोविंदाने नांदत आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा आपल्या शहरामध्ये लवकरच उभारला जाणार असून त्याची प्रतिकृती दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयात बसवण्यात आली आहे आणि दुसरा आपल्या शहरात बसविण्यात येणार आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत शपथ घेतली. यावेळी आ. संग्राम जगताप, प्रा. माणिकराव विधाते, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस न्याय विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, अजय साळवे, मयूर बांगरे, जयंत गायकवाड, संजय खामकर, सिद्धार्थ आढाव, सुमित गायकवाड, ॲड. संदीप पाखरे, शहर अभियंता मनोज पारखे, इंजि. श्रीकांत निंबाळकर आदींसह नागरिक उपस्थित होते.

मुंबईतील येथे २६/११ रोजी झालेल्या हल्ल्यातील शहीद पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. महाराष्ट्र मुंबई पोलिसांनी नेहमीच आपल्या जीवाची पर्व न करता जनतेचे संरक्षण करण्याचे काम केले आहे. दहशतवाद्यांना एक हात करीत त्यांचा खत्मा करण्याचे काम केले असल्याचे मत आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

## दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

मुंबई – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा फेब्रुवारी – मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणार आहेत. या परीक्षांचे वेळापत्रक मंडळामार्फत www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती मंडळाचे सचिव देविदास कुलाल यांनी दिल्याचे मुंबई विभागीय सचिव ज्योत्स्ना शिंदे – पवार यांनी कळविले आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण, द्विलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाइन परीक्षा) ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ या कालावधीमध्ये घेण्यात येतील. तर, प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच एनएसक्यूएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये घेण्यात येतील.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या कालावधीमध्ये घेण्यात येतील. तर, प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा ३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२५ या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/ उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी आणि विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे.

अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हाट्सप किंवा तत्सम माध्यमातून प्रसारित झालेले वेळापत्रक ग्राह्य धरु नये, असेही राज्य मंडळामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## नगरमध्ये १ डिसेंबर रोजी रक्तदान शिबीर

### जय आनंद महावीर युवक मंडळ व सुरेश मुनोत फौंडेशनतर्फे आयोजन

नगर – जय आनंद महावीर युवक मंडळ व सुरेश मुनोत फाऊंडेशनच्यावतीने १ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवीपेठ येथील बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेत सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत हे शिबिर होणार आहे अशी माहिती मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा व सुरेश मुनोत फौंडेशनतर्फे मुनोत परिवाराने दिली आहे.

अत्यवस्थ रूग्ण, रक्तासंबंधी आजार असलेल्या रूग्ण, अपघातग्रस्त रूग्णांना एखाद्याने केलेले रक्तदान हे जीवन देण्याचे काम करते. सामाजिक बांधिलकी जपताना रक्तदान चळवळीला वृध्दींगत करणे, त्यात सक्रिय योगदान देणे गरजेचे आहे. गेल्या १२ वर्षांपासून अहमदनगर मर्चंटस् बँकेचे माजी चेअरमन स्व.सुरेश मोतीलाल मुनोत यांच्या स्मरणार्थ स्वरुपात रक्तदान शिबीर घेण्यात येते.

या शिबिरात पुरुषांइतकाच महिलांचाही सहभाग असतो. नगर शहरातील रक्तपेढींच्या टीम रक्त संकलनाचे काम पाहणार आहेत. या शिबिरात रक्त दात्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन मंडळाचे सर्व पदाधिकारी व सभासदांनी केले आहे.



## भीमशक्तीच्या वतीने संविधान गौरव दिन साजरा

भीमशक्तीच्या वतीने संविधान गौरव दिन मार्केटयार्ड समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भीमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष हंडोरे यांच्या मार्गदर्शनाने शहरांमध्ये विविध ठिकाणी संविधानाचे वाटप करण्यात आले. यावेळी भीमशक्तीचे शहर जिल्हा अध्यक्ष संजय जगताप, जिल्हा महासचिव पोपटराव जाधव, अशोक खंडागळे, बाळासाहेब घोरपडे, अमोल काळकुंड, विशाल भिंगारदिवे, सुबोध वाकचौरे, अभय गायकवाड, नित्यानंद कांबळे, सुनील ठाकरे, विनायक साठे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. तसेच मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना देखील भीमशक्तीच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

## नाशिकरोड येथे मराठा सोयरीक संस्थेचा ३० नोव्हेंबर रोजी मोफत वधू वर मेळावा

### अखंड मराठा समाज व मराठा सोयरिक संस्थेतर्फे आयोजन

नगर – अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने नाशिकरोड येथे मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा आयोजित केला असल्याची माहिती विठ्ठल प्रसाद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजयकुमार गायधनी, महाराष्ट्र माझा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विकास (बंटी) भागवत, मराठा सोयरीक संस्थेचे संस्थापक अशोक कुटे यांनी दिली आहे.

हा मेळावा नेहमीप्रमाणे मोफत असून ९२ वा मेळावा ३० नोव्हेंबर रोजी नाशिक रोड येथे कदम लॉन्स, (मुक्तिधाम मंदिरा जवळ) होणार आहे. तरी जास्तीत जास्त वधु वर पालकांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन फकीरराव वाळुजी कदम, डी. जी. पाटील, शंकरराव सोमवंशी, रामनाथ मालुंजकर, शरद जगताप, धनंजय घोरपडे, योगेश नाटकर, छायाताई झाडे, राजेंद्र खताळे, राजाराम मुंगसे, अश्विनी महाले, चंद्रभान मते, विनोद पोखरकर, कमलेश कोते, प्रभाकर कड आदींनी केले आहे.

या मेळाव्यासाठी येताना वधू– वरांनी स्वतः २ फोटो, बायोडाटा घेऊन पालकांसह मेळाव्यास यायचे आहे. अनेक वेगवेगळ्या तालुक्यातील व वेगवेगळ्या जिल्ह्यातील सर्व प्रकारचे स्थळे या ठिकाणी बघायला मिळणार आहेत. अधिक माहितीसाठी ७०२०२८१२८२ या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे

आज काल मुलांना लग्नासाठी लवकर मुली मिळत नाही, त्यांचे लग्न जमत नाही. तसेच शेतकरी मुलांसोबत कोणीही लग्न करायला तयार होत नाही. आपले नातेवाईक मित्रपरिवार यांना देखील वेळ मिळत नसल्यामुळे कोणीही स्थळ दाखवण्यात आता मदत करत नाही. म्हणून अशा वधू वर मेळाव्यांची दिवसेंदिवस गरज पडत आहे. मराठा सोयरीक संस्थेने आतापर्यंत ९१ यशस्वी वधू वर मेळावे मोफत घेतले आहेत. या संस्थेकडून आतापर्यंत ४१०० लग्न पार पाडलेले आहेत. त्यापैकी ६०० लग्न हे विधवा, विदुर, घटस्फोटीत यांचे पार पडलेले आहेत. धर्मादाय कार्यालयात नाव नोंदणी केलेली शासनमान्य अशी ही संस्था आहे.

## स्वामी सहजानंद भारती कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचा १ डिसेंबरला स्नेहमेळावा

नगर – स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर महाविद्यालयाच्या १९७९ – ८० या बी.एड्. बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा १ डिसेंबरला हॉटेल संजोग, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार असल्याचे समन्वयक, माजी प्राचार्य साहेबराव भणगे यांनी सांगितले.

पंचाहत्तरीच्या उंबरठ्यावर असलेल्या या माजी विद्यार्थ्यांचा हा आगळावेगळा मेळावा असुन या मेळाव्यासाठी बी.एड्. कॉलेजचे माजी प्राचार्य पी. एल. नानकर (पुणे), प्राचार्य एस. ए. अनारसे, विद्यमान प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे (श्रीरामपूर), प्राचार्या नजमा मणेर, प्रा. एस. टी. चव्हाण, प्रा. बी. जे. दळवी (सातारा) तसेच एस. एन. डी. टी. विद्यापीठ बी. एड्. कॉलेजच्या प्राचार्या डॉ. संगिता शिरोळे यादेखील उपस्थित राहणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यासह नाशिक, बारामती, दौंड, पुणे, चिपळूण, कल्याण, खटाव, कराड, सातारा, सांगली, माळशिरस आदी ठिकाणाचे १९७९–८० या बी. एड्. बॅचचे सर्व माजी विद्यार्थी उभयता उपस्थित राहणार असल्याची माहिती संयोजन समितीने दिली.

या स्नेहमेळाव्यानिमित्त चंद्रकांत खांडगौरे यांनी माजी विद्यार्थी व प्राध्यापकांच्या विशेष माहितीचे संकलन केले असुन त्यांनी संपादन केलेल्या 'सहजानंद' या पुस्तकाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे.

मेळावा यशस्वी होण्यासाठी शिवाजीराव थोरात, संभाजीराव रोहोकले, भास्कर नरवडे, सतीश बडवे, लक्ष्मण निकम, श्रीमती सुजाता मालपाठक, सुमती नवले – लांडे या प्रयत्नशील आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

